मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी



विदर्भ साहित्य मंदिराची इमारत
अजून समोरील कळसाची बांधणी व्हावयाची आहे.

वर्ष ९
अंक २
मे १९५४
किंमत आठ आणे

संपादक
पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

या अंकांत

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररयांसाठी मंजुरी मिळालेलें
विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ९ वें]   मे १९५४   [अंक २ रा

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमानें सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

अनुक्रमणिका

या अंकांतील लेखक

वा. वा. भोळे— सुप्रसिद्ध नाटककार 'अरुणोदय', 'सरलादेवी,' इत्यादि नाटकांचे कर्ते, नाट्यमर्मज्ञ आणि टीकाकार.

प्र. ब. माचवे— मराठी व हिंदी भाषेंतील प्रसिद्ध विवेचक. अनेक भाषाविद्. 'समीक्षाकी समीक्षा', 'जैनेंद्रके विचार' या हिंदी व 'टीका' या मराठी ग्रंथांचे लेखक.

द. चिं. सोमण—प्रसिद्ध कवि व कथाकार. युरोपीय वाङ्मयांतील उत्कृष्ट कथांचे अनुवादक. 'झिमझिम' (काव्यसंग्रह) 'वाड्यांच्या वाड्यांत' (कादंबरी) हीं त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

वा. रा. कांत— प्रसिद्ध कवि. 'रुद्रवीणा', 'शततारका' काव्यसंग्रह प्रकाशित. आगामी–आशिया (खंडकाव्य), युगचाहुली (खंडकाव्य).

व

गुणाकर देशपांडे, बाबा मोहोड, उ. रा. गिरी, ना. बा. शास्त्री—
विदर्भाचे कवि.

युगवाणी

वर्ष ९ वें	मे १९५४	अंक २ रा

संपादकीय

१ नवें वर्ष

विदर्भ साहित्य संघाचें वर्ष ३१ मार्च रोजीं संपतें.

१ एप्रिल पासून नव्याने निवडलेलें कार्यकारी मंडळ अधिकारारूढ होतें व तें पुढील वर्षासाठी निरनिराळ्या कार्यसमित्यांची नेमणूक करतें. या नव्या वर्षी 'युगवाणी' चालविण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळानें नव्या संपादकमंडळावर टाकली आहे. या नव्या संपादकमंडळाच्या मार्गदर्शनानुसार निघणारा नव्या वर्षाचा हा पहिला अंक आहे. वस्तुतः गेला अंकच नव्या वर्षाचा पहिला अंक होता. परंतु त्याची सर्व तयारी जुन्या संपादक-मंडळालाच करावी लागल्यामुळे या अंकापासूनच नव्या संपादक-मंडळाचें कार्य सुरू होत आहे.

नवें वर्ष म्हणून नवें संपादक-मंडळ आलें तरी 'नवी विटी-नवें राज्य' असा प्रकार होण्याचा संभव नाही. कारण 'युगवाणी' हें विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र असल्यामुळे त्याच्या धोरणांत सातत्य हें राहणारच. या सातत्याच्या मर्यादेंत नव्या संपादक-मंडळावरील कांहीं ताज्या दमाच्या सहकाऱ्यांची छाप संपादनावर पडणें मात्र संभवनीय आहे. आणि हें प्रगतीच्या दृष्टीनें इष्टहि आहे, असें आम्हांस वाटतें.

'युगवाणी' अधिक वाचनीय व प्रगतिशील व्हावी अशी सर्वांचीच इच्छा आहे. या दृष्टीने दर वर्षी कांही योजना आखली जाते. या वर्षीहि नव्या संपादक-मंडळाने कांही संकल्प केले आहेत. त्यांची रूपरेषा थोडक्यांत सांगणें योग्य होईल.

*

२ आमचे संकल्प

विदर्भ साहित्य संघाचें कार्य आता बरेंच बहुविध व भरीव स्वरूपाचें होऊं लागलें आहे. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीचा संकल्पित भव्य नाट्यगृह वगळून इतर भाग पूर्ण झाला आहे. त्याचें उद्घाटन राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें एप्रिलच्या दिनांक २७ रोजीं मोठ्या थाटानें झालें. संघाला आता प्रशस्त 'घर' प्राप्त झालें आहे. त्यामुळे भाषा साहित्य व संस्कृति यांना वाहिलेली ही संस्था सामाजिक दृष्ट्या जरा भारदस्त होऊं लागली आहे. म्हणून संघाच्या या वाढत्या कीर्तीस साजेसें कार्य 'युगवाणी'च्याहि माध्यमांतून होणें आवश्यक झालें आहे.

ही सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेऊनच आम्ही कांही संकल्प केले आहेत. 'युगवाणी'त समग्र महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र यांच्या परिसरांत होणाऱ्या साहित्यक चळवळींची माहीती देणें, इतर भारतीय भाषांतील साहित्य व साहित्यिकांचा परिचय करून देणें, आणि जागतिक वाङ्मयांतील उल्लेखनीय हालचालींचीहि थोडीबहुत दखल घेणें, असें स्थूल मानानें आमच्या नव्या संकल्पांचें स्वरूप आहे.

या संकल्पांची पूर्तता होणें, हें बहुतांशीं जाणकार सदस्य व वाचक यांच्या हार्दिक सहकार्यावरच अवलंबून आहे या कामीं प्रांताबाहेरील कांही नामवंत साहित्यिकांचें व लेखकांचें सहकार्य [illegible] कांहींहि आम्हा योजिलें आहे. हें सहकार्य आम्हांस पुरेशा प्रमाणांत लाभेल, अशी आमची अपेक्षा आहे.

पण केवळ बाहेरून येणाऱ्या सहकार्यावरच आमच्या संकल्पांचा डोलारा आम्हा रचला नाही. या

अनुक्रमणिका

संकल्पांना मूर्तरूप आणून देण्यासाठी नव्या संपादक-मंडळावरील प्रत्येकानें आपला हातभार लावण्याचें ठरविलें आहे. आमच्यापैकी प्रत्येकाला आपापले इतर व्यवसाय सांभाळूनच हें कार्य करावें लागणार असल्यामुळे आमच्या संपादकीय कार्यशक्तीला कांहीं मर्यादा येतातच. ही वस्तुस्थिति ध्यानांत घेऊन आमच्या कार्याकडे वाचकांनी पहावें एवढीच आमची नम्र विनंती आहे.

*

३ स्वातंत्र्य आणि साहित्य

गेल्या महिन्यांत संघाच्या व्यासपीठावरून प्रजासमाजवादी पक्षाचे एक प्रमुख नेते, प्रतिभाशाली विचारवंत व व लेखक श्री. अशोक मेहता यांचें एक सुश्राव्य व्याख्यान झालें. ' स्वातंत्र्य व साहित्य ' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अशोक मेहतांनी या विषयाची मांडणी फार मूलगामी भूमिकेवरून व रेखीव स्वरूपांत केली.

साहित्य व कला हा मानवी प्रतिभेचा एक विलास आहे. पण या विलासाला मूर्त रूप जें येतें तें कलावंताच्या उत्कट स्वरूपाच्या जीवनसंघर्षांतूनच येतें. या दृष्टीने कला व साहित्य हा सतत प्रगमनशील अशा सामाजिक संघर्षाचाच एक परिपाक आहे. हा परिपाक घडून येण्यासाठी स्वातंत्र्याचें वातावरण समाजांत नांदणें अत्यावश्यक आहे. त्याशिवाय साहित्य व कला यांचा विकास तर राहोच पण त्यांची निर्मितिदेखील अशक्य होईल.

सांप्रत जगांत दोन परस्परविरुद्ध वैचारिकांचा भीषण संघर्ष चालू आहे. त्यामुळे राज्ययंत्रांचा व्याप सारखा वाढत आहे आणि मानवी जीवनांतील स्वातंत्र्याचा संकोच घडून येत आहे. ही परिस्थिति सर्व सर्जनशील कलांना भयावह ठरूं पाहत आहे. सर्जनशील कला ही कल्पनांच्या, विचारांच्या संघर्षांतून आकारास येत असते. पण आज कल्पना व विचार यांच्या संघर्षाऐवजीं अर्थांचे संघर्ष उग्रता धारण करूं लागले आहेत. (Conflict of interests is fast replacing the Conflict of Ideas). अर्थ, स्वार्थ, स्वास्थ्य, सुबत्ता कलावंतांना मुळीच नको असते असें नाहीं. पण केवळ अर्थ वा स्वार्थ हा कलावंताच्या प्रतिभेला केव्हांहि प्रेरक ठरलेला नाही. अर्थप्रधान वैचारिकांनी वैयक्तिक, वर्गीय वा सामूहिक स्वार्थाला प्राधान्य देऊन एक ' समूह-मानव ' (mass man) आकारास आणण्याचा प्रचंड खटाटोप आरंभिला आहे. त्यामुळे व्यक्तित्व, व्यक्तित्वविकास व स्वातंत्र्य यांच्या ज्योती लोपत आहेत आणि ' माध्यान्हीचा काळोख ' जगोला व्यापूं पाहत आहे. अर्थप्रधान वैचारिकांचें हें स्वप्न साकार झाल्यास स्वातंत्र्याचें वातावरण संपुष्टांत येईल आणि कला व प्रगति असंभवनीय होऊन बसेल.

कलानिर्मितीला व्यक्तित्वाचें आणि अनेक-निष्ठ (Plural Loyalties) प्रवृत्तींचें अधिष्ठान आवश्यक असतें. कलावंताला पाखरांप्रमाणे झाडावर एक खोपा जसा लागतो तसेच भराऱ्या मारावयासाठी विशाल आकाशहि त्याला हवें असतें. पण अर्थप्रधान वैचारिक एकच एक अशा सर्वव्यापी निष्ठेची मागणी करीत असतात. त्यांमुळे राजकीय निष्ठेबरोबरच, सामाजिक, सांस्कृतिक व वैयक्तिक निष्ठांचें केंद्रीकरण घडवून आणण्याचा अट्टाहास त्या करीत असतात. ही घटना कलानिर्मितीला व कलाविकासाला संपूर्णपणें मारक अशी आहे.

श्री. अशोक मेहता यांच्या व्याख्यानाचें सार हें असें आहे. कलानिर्मितीच्या प्रक्रियेबावत संघर्ष व ताण (Conflict and tension) यावर आधारलेला त्यांचा सिद्धांत कांहींना वादग्रस्त वाटला तरी विद्यमान जागतिक संघर्षाच्या विशिष्ट परिस्थितींत व ही परिस्थिति ज्यांना तीव्रतेने जाणवते त्यांच्यापुरता तरी तो अर्थपूर्ण मानण्यास प्रत्यवाय असूं नये.

मौलिक विचारांनी परिपूर्ण असें सुंदर व्याख्यान दिल्याबद्दल श्री. अशोक मेहता यांना आम्ही धन्यवाद देतों.

*

४ मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक

गेल्या ५० वर्षांतील आधुनिक भारतीय विचारवंतांत मानवेंद्रनाथ रॉय हे अग्रगण्य होते. त्यांचें राजकीय कार्य जितकें साहसपूर्ण थोर दर्जाचें होतें तितकेंच, किंबहुना त्याहून अधिक मोलाचें असें त्यांचें विचार-प्रवर्तक लेखनकार्य होतें. यशस्वी राजकीय नेता म्हणून रॉय यांचें नांव इतिहासांत कदाचित् नमूद केलें जाणार नाही, परंतु एक विचारप्रवर्तक तत्त्वज्ञ व लेखक म्हणून त्यांचें नांव अनेक वर्षे जागतिक वैचारिक क्षेत्रांत निश्चितपणें गाजत राहील.

पाश्चात्य विचारप्रवाह आत्मसात करून भारतीय जीवनगंगेचें पात्र अधिक विशाल व समृद्ध करण्याच्या प्रयत्नांतून भारतीय आधुनिकता आकारास आली आहे. भारतीय विचारपरंपरेपासून तुटून वेगळे झालेले आणि तरीपण भारताचें भवितव्य उज्ज्वल करण्याच्या आकांक्षेनें प्रेरित झालेले जे विचारवंत, त्यांनाच यथार्थतेनें ' आधुनिक ' हें विशेषण लावतां येईल.

अशा विचारवंतांत आपल्या अविश्रांत विद्याव्यासंगानें आणि प्रतिभेनें आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविणारे जे थोडे भारतीय विचारवंत आहेत त्यांत रॉय यांना फार मोठ्या मानाचें स्थान द्यावें लागेल.

अशा थोर व आता दिवंगत झालेल्या विचारवंताच्या स्मृतीस श्रद्धांजलि अर्पण करण्याच्या हेतूनें पुण्याच्या ' नवभारत ' मासिकानें एक विशेषांक काढला आहे. रॉय यांच्या कार्याचें व वैचारिकेचें यथार्थ दर्शन महाराष्ट्रीय वाचकांस घडविण्याच्या कामीं हा अंक फार उपयुक्त ठरेल यांत शंका नाही. या उपक्रमाबद्दल ' नवभारता 'चे संचालक व संपादक-मंडळ धन्यवादास पात्र आहेत.

या विशेषांकांतील लेखक बहुतांशी रॉय-वादीच आहेत. एका अर्थानें हें स्वाभाविक असलें तरी ' नवभारत ' या वैचारिक म्हणून नांवाजलेल्या प्रमुख महाराष्ट्रीय मासिकापासून स्वतंत्रप्रज्ञ व पंथमुक्त महाराष्ट्रीय विचारवंत ज्या अपेक्षा बाळगतात त्या या विशेषांकानें पूर्ण होतील असें आम्हांस वाटत नाही. केवळ रॉय-भक्तांना आपल्या वैचारिक गुरूचें ऋण फेडण्यासाठी आपला एक अंक बहाल करून देणें यांत औदार्य असलें तरी ' नवभारता 'च्या संचालक-संपादक—मंडळाचें बौद्धिक आलस्यहि त्यामुळे प्रकट झालें आहे. ' रॉय-वाद ' म्हणून जो ओळखला जातो त्याची स्वतंत्र व बुद्धिनिष्ठ चिकित्सा करणारा एकहि लेख या विशेषांकांत समाविष्ट होऊं नये, ही ' नवभारता ' च्या कीर्तीत मोठीशी भर टाकणारी घटना खास नव्हे.

हे एक महत्वाचें वैगुण्य वगळलें तर हा विशेषांक फार वाचनीय व संग्रहणीय आहे यांत शंका नाही.

" मानवेंद्रनाथ रॉय यांचें जीवन व विचार यांचें सम्यक व समग्र परिशीलन करण्यास उपयुक्त असें संक्षिप्त समालोचन वाचकांच्या हातीं या विशेषांकाच्या रूपानें आम्ही देत आहोंत. " हें संपादकीय निवेदन अगदी यथार्थ आहे.

रॉय-वाद हा मार्क्सवादांतून निघालेला एक पाट आहे. रॉय हे शेवटीं मार्क्सवादापासून इतके दूर गेले की ते व त्यांच्याप्रमाणेच मार्क्सवादाच्या मगरमिठींतून विमुक्त झालेले इतर अनेक देशांतील विचारवंत यांनी आपल्या नव्या विचारप्रणालीला ' नवमानवतावाद ' हें विशेष नांव दिलें. केवळ मानवतावाद या विचारवंतांना मान्य नाही. कारण त्यांत जुन्या-नव्याची भेसळ केली जाते व वैचारिक काटेकोरपणाला वाव राहत नाही. पण ' नव-मानवतावाद ' या वादाचें तर्ककठोर विश्लेपण केल्यास सरतेशेवटीं हा वाद अस्सल भारतीय अशा नव-वेदांतवादांतच समाविष्ट केला जाईल, असें भाकित करण्यास आम्हांस मुळीच प्रत्यवाय दिसत नाही.

क वि ता

आणखी एक पान गळलें

झुळुक आणखी एक आणखी एक पान गळलें
पानीं फुलला, सुमनिं बहरला
आंगणांत हा जरि तरु वठला
शुष्क डाहाळित अंग मोडिती कोंभ नवे दडले
झुळुक आणखी एक आणखी एक पान गळलें

२

ढग उठले, चढले, गडगडले
तृषित धरेवरि रिचले सरले
आणि पांगल्या विरल्या मेघीं इंद्रधनुष फुललें

३

चंद्रकोर अंगांगीं भरली
दिनदिन कणकण तेवत खरली
परि अवसेच्या प्रभात–ओटिंत सूर्यबिंब भरलें
झुळुक आणखी एक आणखी एक पान गळलें

४

चरण एक गीताचें सरलें
स्वर अवसानीं शांत जाहले
त्या मौनांतुनि पुढिल चरण परि झंकारी सजलें
झुळुक आणखी एक आणखी एक पान गळलें

५

खुशाल गळतां गळा दळांनो,
हसत सरा माझिया क्षणांनो,
बघे क्षणांच्या पानझडिंत मी अक्षयपण उमलें
झुळुक आणखी एक आणखी एक पान उमललें

—कान्त

आणि त्याच क्षणीं

विशालतेचें पीत प्रदर्शन
दर्यावरती झुले चंद्रमा
पेंगत होता घुक्याखालती
धूसरलेला धुंद नीलिमा

मध्यरात्रिच्या बुरख्याखाली
लपवित अपुली हलती छाया
बावरलेला पवन धरेची
चुंबित होता उघडी काया

दर्वबिंदूची करीत प्रतिक्षा
कुठे तृणाचें अजाण पातें
नीरवतेवर लिहीत होतें
निःशब्दाचीं अबोल गीतें

खडकावरती नमवित माथा
उसळत होत्या अगणित लाटा
अंग टाकुनी धरतीवरती
स्फुंदत होत्या पाउलवाटा

आणि त्याच क्षणीं स्वप्नीं माझ्या
ढाळित होतें अश्रु कुणीतरि
तगमग होती होत जिवाची
आग पेटली होती अंतरिं !

— बाबा मोहोड

अनुक्रमणिका

रात काजळी...

रात काजळी, असे वावळी
भुतासारखा पिसाट वारा
भीषण शांती किरकिरणारी
गोटयासम बरसतात धारा.

अशा वादळीं एक झोपडी
भिंतींना सावरून धरूनी
उभीच आहे प्राणपणाने
मृत्यूच्या पायास पकडुनी.

गवताचीहि शिवण उसवली
मोडुन पडलें वरचें आढें
कूड निखळला भिंतींवरचा
उडून गेलीं आणि कवाडें.

रिंगण धरुनी आंत नाचतो
सोसाटयाचा वादळवात
कुठे भिरंगत उडून गेली
दिवटीमधली जळकी वात !

नसलेला घेऊन निवारा
आंत बैसली आहे वृद्धा
थंड, अचेतन, परि कवटाळुन
जगण्यामधली असीम श्रद्धा.

अधीर, आतुर कान ऐकण्या
कुठे कोंबडा देतो बांग !
दृष्टीमध्ये प्राण साठले
उगवतीस कधि येईल जाग !

मनांत म्हणते 'सरतां वादळ
जरा क्षितिजीं फुटतां ओम
आवरीन हें खोपट अपुलें
शिविन उद्या मी गवत तमाम'

—गुणाकर दशपांडे

पाहतेस कां उगाच वळुन सारखी ?

पाहतेस कां उगाच वळुन सारखी ?
आज चांदरात आपणांस पारखी

नील अंबरांत कृष्णमेघ दाटले
तारकाजडीत रत्नमंच झाकलें

रात काजळी भयाण आज घातकी !
पाहतेस कां उगाच वळुन सारखी ?

दीप मालवीत बेगुमान वादळें—
धावतीं, कुठे दुरांत वीज कोसळे

जाहल्या तमांत दाट क्षीण ओळखी !
पाहतेस कां उगाच वळुन सारखी ?
आज चांदरात आपणांस पारखी.

—उ. रा. गिरी

ढग आले अन् निघून गेले

ढग आले अन् निघून गेले
नच पाण्याचा थेंब लाभला
धगधगत्या आशेच्या आगीं
व्यर्थ घरेचा जीव पोळला.

टाकित बसली उष्ण उसासे
तडावलेली दाबुनि छाती
बीज पेरलें कुणी तयाची
होरपळोनी झाली माती.

पिऊनि जाई अता हिवाळा
उरला सुरला ओलावाही
उलत्या ओठावरून धरती
जीभ कोरडी फिरवित राही.

वसंत येई—येइ उन्हाळा
लबाड मृगजळ घेउनि ओठीं
मेघांचा मल्हार आळवित
चुंबुन जाई ही वांझोटी.

—ना. बा. शास्त्री

लघुकथा

पावसांतलें मांजर

अनुवादक : द. चिं. सोमण

इटालीमधील त्या भव्य हॉटेलांत अमेरिकन व्यक्ति अशा त्या दोनच होत्या. तो आणि ती. त्यांचें नातें पतिपत्नीचें होतें.

समुद्राच्या बाजूकडील दुसऱ्या मजल्यावरची एक प्रशस्त खोली हॉटेलच्या मॅनेजरनें त्यांना दिलेली होती. खोलीच्या खिडकींतून बाहेरची सार्वजनिक बाग, त्या बागेंतला प्रचंड युद्धस्मारक स्तंभ व पलीकडचा निळा निळा समुद्र हीं फार छान दिसत ! हवा उत्तम असली, सूर्यप्रकाश कोसळत असला म्हणजे एखादा तरी चित्रकार फलक पुढें मांडून बसलेला हमखास दिसायचा. ताडाचीं सडपातळ उंच झाडें, क्षितिजापर्यंत पसरलेला सागर, ती गर्द बाग हीं सारीं कुणाहि चित्रकाराच्या नजरेंत भरतील इतकीं आकर्षक होतींच ! तो स्मारकस्तंभदेखील फार प्रेक्षणीय होता. कितीतरी इटालियन लोक तें स्मारक बघायला मुद्दाम दुरून येत. पंचरसी धातूंचा होता तो आणि वर एक मोठा पुतळा ! पाऊस पडून तो भिजला व नंतर त्यावर ऊन पडलें तर डोळे तिथेंच खिळत !

आजसुद्धा पाऊस सारखा कोसळत होता. ताडांच्या पानांवरून अखंड धारा चौफेर खाली पडत होत्या. बागेंतल्या पायवाटांवर टाकलेल्या गारगोटयांच्याभोंवताल लहान लहान तळीं साचलीं होतीं, छोटीं बेटेंहि आपले चिमुकले आकार दाखवीत होतींच ! समुद्र सारखा झेपावून किनाऱ्याकडे येई. तिथे त्याच्या लाटा फुटल्या की पाण्याचा जाड थर वाळूवर पसरे ! स्मारकाभोवतीं खूप मोकळी जागा होती व तिथे नेहमीं अनेक मोटारी उभ्या असत. तथापि आज एकहि वाहन नव्हतें त्या ठिकाणीं ! हॉटेलच्या समोरच पण जरा डावीकडे एक भव्य उपाहारगृह होतें. त्याच्या प्रवेशद्वारांत शुभ्र कपडे घातलेला एक नोकर पावसाकडे पहात निश्चल उभा होता.

हॉटेलांत उतरलेल्या त्या अमेरिकन जोडप्यापैंकी ती तरुण स्त्री खिडकीशी बाहेर बघत उभी होती. त्या खिडकीखालीच हॉटेलसमोर असलेल्या विस्तृत चौथऱ्यावर अनेक हिरवीं टेबलें व त्याभोवतीं हिरव्या खुर्च्या मांडलेल्या होत्या. चौथऱ्याच्या फरसबंदींत त्या टेबलखुर्च्या पक्क्या बसवून टाकलेल्या असल्यानें उचलतां येत नसत. हवा चांगली असली म्हणजे तिथें बसून उन्हांत चहा वा इतर पेयें घेणें मोठें सुखकर होई ! आता पावसांतसुद्धा त्या टेबलखुर्च्या जागींच होत्या. त्यांच्यावरून पावसाचें पाणी चारहि बाजूंनी खालच्या दगडी जमीनीवर पडत होतें. टेबलांपैकी एकाच्याखाली एक गुबगुबीत मांजर अंग चोरून कोरडें राहण्याच्या प्रयत्नांत पायांची चाळवाचाळव करीत बसलें होतें !

"मी जाऊन त्या मांजराला घेऊन येतें, किती छान आहे तें ! भिजतं आहे बिचारं !"— ती अमेरिकन पत्नी म्हणाली.

तिचा तरुण अमेरिकन नवरा बिछान्यावर पायांखाली उशा ठेवून वाचत पडला होता.

"तूं कुठे जातेस पावसांत ! थांब, मीच जातों !" तो म्हणाला.

"अंहं ! मीच जाणार ! बिचारं टेबलाखाली कुडकुडत बसलं आहे ! मीच जाऊन त्याला घेऊन येतें !" ती म्हणाली.

फार सुरेख होती ती दिसायला. तिच्या स्वभावांतला बालिशपणा अजून तसाच कायम होता. तिच्या गोड चेहऱ्यावरूनच कुणीहि तिचा अल्लड खेळकर स्वभाव ओळखला असता ! तोहि खूप देखणा होता. अगदी अनुरूप होतीं तीं एकमेकांना !

"बरं"—असें म्हणून तो पुन्हा वाचनांत गुंग झाला—"भिजूं नकोस हं पण !"—तिच्याकडे न बघतांच त्यानें सूचना केली.

अंगाला नाजूक हेलकावे देत ती जिन्यावरून खाली आली. तिला पाहून हॉटेलचा मॅनेजर चटकन् उठून उभा राहिला आणि मान वाकवून त्याने तिला अभिवादन केलें. मॅनेजरचें टेबल दिवाणखान्यांत अगदी एकीकडे होतें. त्या उंच म्हाताऱ्या मॅनेजरकडे हसत बघत ती पुढे गेली.

"किती पाऊस हा !"– जातां जातां ती म्हणाली.

"फार फार वाईट हवा पडली आहे आज ! वादळच सुरू आहे म्हणायचं !"– मॅनेजर म्हणाला.

तिला तो गोड आवाजाचा सभ्य मॅनेजर फार आवडे ! आश्चर्य नव्हतें त्यांत ! कांहीहि तिला आवडलें की नेहमीच आवडे आणि कांही आवडलें नाही की तें डोळ्यासमोर नकोसें होई ! त्या मॅनेजरच्या चेहऱ्यावरचें गांभीर्य, कुणाच्याहि तक्रारीकडे आस्थेने बघण्याची पद्धत, वागण्यांतील आदब, इतकेंच काय पण त्याचे चौकोनी तळहात व मोठा चौकोनी चेहरा हीं सगळींच तिला फार आवडत ! किती आवडण्यासारखा होता तो !

घाईघाईनें प्रवेशद्वारापर्यंत जाऊन तिने स्वतःच तें उघडलें. प्रत्येक बाबतींतच ती एकदम अधीर होई ! तिने दरवाजा उघडला आणि पावसालाहि जणूं अवसान आलें, ती किंचित् मागे झाली. रेनकोट घातलेला मध्यम वयाचा एक इसम पळतच समोरच्या उपहारगृहाकडे जातांना तिला दिसला. त्याची त्रेधा पाहून तिला एकदम हसूं आलें !

तिची नजर मांजर असलेलें टेबल शोधूं लागली. उजवीकडच्या चारदोन टेबलांखालीच कुठेतरी तें असायला हवें होतें. ती तशी दारांत उभी असतांनाच तिच्या डोक्यावर कुणीतरी उघडलेली छत्री धरली. तिने वळून मागे पाहिलें. तिच्या खोलीची-व्यवस्था ठेवणारी वाटोळ्या गोड चेहऱ्याची इटालियन मुलगी होती ती !

"असं भिजून चालायचं नाही या हवेंत !"–ती म्हणाली. तिला मॅनेजरनेच नक्की धाडलें होतें.

हसतच ती पावसांत चौथऱ्यावर आली. ती इटालियन मुलगी छत्री तिच्या डोक्यावर धरीत तिच्या बरोबर तेथपर्यंत आलीच. झगा आवरून धरीत उजवीकडच्या सगळ्या टेबलांखाली त्या अमेरिकन तरुणीने डोकावून पाहिलें. कुठेच नव्हतें तें मांजर ! तीं हिरवीं टेबलें पावसाने चकचक धुवून काढल्यामुळे अधिकच हिरवीगार झालीं होतीं व निथळें तें गुबगुबीत मांजर मात्र बेपत्ता झालें होतें ! ती एकदम अगदी खिन्न झाली !

त्या इटालियन मुलीने तिच्याकडे चमकून पाहिलें.

"काय झालं बाईसाहेब ? काय शोधतां आहांत आपण ? काय हरवलं ?"

"एक मांजर होतं इथं कुठेसं !"

"मांजर ?"

"हं, मांजर ! एक छान मांजर ! भिजत होतं बिचारं पावसांत !"

"मांजर !"–ती मुलगी खूप हसली," पावसांतलं मांजर !"

"हं ! इथं टेबलाखालीच होतं ! हवं होतं तें मला ! हवंच होतं !"

ती इंग्रजींत बोलत असल्याने त्या इटालियन मुलीला तिचें बोलणें नेहमीच कान देऊन ऐकावें लागे.

"चला वरं बाईसाहेब ! आंत चला अगोदर. भिजलांत तुम्ही ! फार वाईट हवा आहे हो, असं भिजून नाही चालायचं !"–ती मुलगी म्हणाली.

"बरं चल, कुठं गेलं तें मांजर कुणास ठाऊक !"

गारगोट्या टाकलेल्या पायवाटांकडे बघत त्या दोघी परत दारांतून आंत आल्या. त्या मुलीने छत्री मिटली. ती अमेरिकन तरुणी तिच्या खोलीकडे पुन्हा जातांना मघाचा तो मॅनेजर पुन्हा उठून उभा राहिला व त्याने तिला अभिवादन केलें. ती हसली

तिने खोलीचा दरवाजा उघडला. तिचा नवरा अजून बिछान्यांत तसाच पुस्तक वाचीत पडला होता. तिला पाहून त्याने पुस्तक खाली केलें.

"मिळालं कां तुला तें मांजर ?"

"अंहं ! मी जाईपर्यंत गेलं निथून!"

"आश्चर्य आहे ! एवढ्यांत कुठे पळालं ?"– पुस्तक आणखी दूर करीत तो हसत म्हणाला.

ती त्याच्याजवळ बसली.

"इतकं हवं होतं मला तें ! कुणास ठाऊक कां, पण हवं होतं, खूप खूप हवं होतं ! भिजत होतं बिचारं ! किती छान होतं तें मांजर !"

तो पुन्हा पुस्तक वाचायला लागला होता.

पलंगावरून उठून ती आरसा लावलेल्या टेबलाशीं जाऊन बसली व टेबलावरचा दुसरा एक मूठ लावलेला आरसा तिने उचलला. त्या दोन आरशांच्या मदतीनें ती आपला मोहक चेहरा निरनिराळ्या कोनांतून बघूं लागली. कांही वेळाने स्वतःच्या मानेचा मागचा भागहि बघायला तिने सुरवात केली.

" मी पुन्हा केस वाढवले तर छान दिसतील, नाही कां ?"

त्याने तिच्याकडे व तिच्या आखूड केसांकडे पाहिलें.

" मला असेच आवडतात ! खरंच, किती सुरेख आहेस तूं !"–तो म्हणाला.

"कंटाळा आला मला या आखूड केसांचा ! खूप खूप कंटाळा आला आहे ! मला नाही आवडत हे पुरुषांसारखे केस !"

तिच्याकडे बघतच त्याने आळस दिल्यासारखें केलें.

"खूपच सुंदर आहेस हं तूं ! एखाद्या दिवशीं फार लक्ष्यांत येतं !"–तो म्हणाला.

हातांतला आरसा खाली ठेवीत उठून ती खिडकीजवळ गेली. अंधार पडूं लागला होता.

"केस खूप वाढवून मग मला ते छान बांधायचे आहेत ! आणि एक छान गुबगुबीत मांजर हवं आहे मला ! त्याच्याशीं खेळत बसायला मजा वाटेल !"

"लहान कां आहेस तूं मांजराशीं खेळायला ?"

"आणि मला कांही छान भांडीं घ्यायचीं आहेत, स्वयंपाकघरांत वापरायला ! आणि मग मेणबत्या लावून टेबलाशीं जेवायचं आपण ! तूं नि मी दोघंच ! आणि नेहमी ऊन हवं पडायला ! आणि आरशासमोर मी आपले लांब केस विंचरीन ! नवीन कपडे देखील हवेत मला ! आणि मांजर मात्र हवंच, अगदी हवंच !"

" किती बोलतेस ! वाचत बस बघूं एखादं पुस्तक !"

बाहेर बराच अंधार पडला होता व पाऊसहि अजून अविश्रांत पडतच होता. ताडांच्या झाडांवर तो पडून तड्तड् असा आवाज होई.

ती घाईघाईने पलंगावर येऊन बसली.

"दुसरं कांही नाही मिळालं तरी चालेल पण मांजर हवंच !"–दिवा व त्याचें पुस्तक यांच्यामधें तळहात आडवा धरीत ती म्हणाली, "मांजर मात्र अगदी हवंच ! एक छान गुबगुबीत पांढरं मांजर ! हवं, आत्ता हवं ! मला मांजर खूप आवडतं ! मांजर हवं मला !"

तो डोळे मिटून हसत होता. तिच्या बालिश मोहक हट्टांची त्याला आतापर्यंत चांगली ओळख झाली होती. तिने तसा कांही हट्ट केला की नेहमीच तो हसत असे.

ती पुन्हा खिडकीशीं जाऊन उभी राहिली. तेवढ्यांत कुणीतरी दार ठोठावलें.

"या आंत !"– तो म्हणाला.

दारांत ती इटालियन मुलगी उभी होती. एक पांढरें शुभ्र गुबगुबीत मांजर तिने छातीशीं दाबून धरलें होतें. मांजराचे पाय हाताच्या कोपरांनी तिने दाबले होते.

"मॅनेजरसाहेबांनी आपल्याकरितां मुद्दाम धाडलं हें मांजर !"– ती म्हणाली, "खूप शोधलं तेव्हा सापडलं अखेर !"

ती अमेरिकन तरुणी पळत मांजराजवळ गेली. ती इटालियन मुलगी हसायला लागली.

[Ernest Hemingway यांची A Cat in the rain ही कथा]

मराठी नाट्यसृष्टींतील अनुभव १. नाटककार

वासुदेव वामन भोळे

'सरलादेवी' नाटकाचे कर्ते व एक मर्मज्ञ टीकाकार श्री. वासुदेव वामन भोळे यांची 'युगवाणी' च्या वाचकांना नव्याने ओळख करून देण्याचें कारण नाही. त्यांचा नाट्यसृष्टीचा अनुभवही मोलाचा आहे. अशा रसिक साहित्यकाराच्या लेखमालेचें पहिलें पुष्प आज सादर करीत आहों.

संपादक

इ. स. १८४३ सालापासून मराठी नाट्याला सुरुवात झाली आणि गेल्या शंभर वर्षांत, मराठी रंगभूमीवर अनेक नाटककार, कमी अधिक प्रमाणांत चमकून गेले. या लेखकांमधील कांहीनी मराठी नाट्याचा पाया रचला. इतरांनी त्यानंतर त्यावर सुंदर इमारत उभी करून, महाराष्ट्र रंगभूमीला अखिल भारतीय अग्रेसरत्व प्राप्त करून दिलें. अशाच थोर नाटककारांच्या कलावैशिष्ट्याचा परिचय, माझ्या नाट्यविषयक दृष्टिकोनांतून, मी आज करून देणार देणार आहे. वैशिष्ट्यांत नावीन्य असतं; आणि बहुजनसमाज हा नाविन्याचा भोक्ता असतो. अर्थात् ज्यांच्यांत प्रतिभेचं कांहीतरी वैशिष्ट्य असतं असेच लेखक हा नाविन्याचा पुरवठा करूं शकतात; इतकंच नव्हे तर स्वतःच्या व्यक्तिवैशिष्ट्यामुळंही ते कलेला, तिच्या विकासाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन बसवतात. ललित वाङ्मय, अर्थात त्यांत नाट्य हें आलंच, हें समाजाचा दर्पण आहे. समाज जेव्हा निद्रिस्त असतो, तेव्हा निर्माण होणारं नाट्य, हें समाजाच्या प्राथमिक अवस्थेचाच आविष्कार करूं शकतं. समाजरंजन हेंच यां नाट्याचं ध्येय. परंतु समाज जेव्हा जागृत होतो तेव्हा, स्वतःच्या सर्वांगीण प्रगतीकरितां त्यांची धडपड सुरू होतें. अशा जागृत समाजासमोर अनेक समस्या आणि ध्येयें उभीं राहतात. या धडपडीमधूनचं ध्येयाविष्कार करणारीं नाटकं निर्माण होतात. अशा ध्येयाविष्कारांत, रंगभूमीवर तो कितीही परिणामकारक झाला तरी, कलेचं अंतिम साफल्य झालेलं दिसत नाही मानवी मनांतील, मद, मोह, क्रोध, मत्सर, दया, प्रेम आणि उदात्तता यांसारखे स्थायी भाव, ज्या नाट्यकृतींत प्रभावानं आविष्कृत झालेले दिसतात, त्याच नाट्यकृति कलेचं साफल्य करतात. समाजमनांतील असत् प्रवृत्तींना आळा घालून, त्यांच्यांतील सत् प्रवृत्तींचा विकास करण्यास, या भावाविष्कार करणाऱ्या कृतीच समर्थ ठरत असतात. अवस्थाविष्कार, ध्येयाविष्कार, आणि भावाविष्कार हे मराठी नाट्याच्या विकासाचे तीन टप्पे, ज्यांच्या कृतींत माझ्या मतें प्रभावानं दृष्टोत्पत्तीस येतात, अशा नाटककारांच्या वैशिष्ट्यांचा, आज मी थोडक्यांत आढावा घेणार आहे. सुमारें १८४३ सालीं विष्णुदास भावे यांनी, कर्नाटकी नाट्याच्या धर्तीवर, मराठींत नाट्यास सुरुवात केली. कर्नाटकी नाट्य नृत्यप्रधान होतं. अशा नाटकांतील कलात्मकता मराठी नाटककारांना घेतां न आल्यामुळे, त्यांतील रहस्य मराठी मनाला आकलन होत नसे. त्यांतील नृत्य म्हणजे त्यांत नुसता धांगडधिंगा वाटे. तेव्हा भाव्यांच्या या "तागडथोम" नाटकांचा महाराष्ट्रीयांना कंटाळा आला. बुद्धिगम्य संवाद व त्याला अनुसरून केलेला अभिनय यांची मराठी मनाला भूक लागली. या मनाची गायनाकडेहि विलक्षण ओढ होती. लावण्या, तमाशे, नायकिणींचीं गाणीं इत्यादि मार्गांनी ही भूक शमविली जात असे. कांही काळानं कीर्तने, महाजनी इत्यादि लेखकांनी शेक्सपीयरच्या

धर्तीवर लिहिलेलीं किंवा खुद्द शेक्सपीयरचींच नाटकं, अनुवाद स्वरूपांत रंगभूमीवर आणलीं. यांना "बुकिश" नाटकं म्हणत. परंतु भावे यांच्या नाटकांतील धांगडधिंगा आणि बुकिश नाटकांतील रुक्षता मराठी मनाला रुचेना. अशा कुचंबणेच्या स्थितींतून तिला सांडविण्याचं महान् कार्य किर्लोस्करांनी केलं. ते स्वतः नट होते; कवि होते. जनमनावरची गायनाची पकड पाहून, आपेराच्या धर्तीवर त्यांनी शाकुंतलाचं रूपांतर रंगभूमीवर आणलं. पूर्वीच्या साकी, दिंडी वगैरे चालींना त्यांनी कर्नाटकी संगीताची जोड दिली. त्यानंतरच्या सौभद्र नाटकांत त्यांनी हीच प्रथा चालू ठेवली. ह्या नाटकांत, बुकिश नाटकांतील कथानक व संवाद उचलले. पण त्यांतील रुक्षपणा जावा म्हणून त्यानी त्यास रसानुकूल संगीताची योजकतेनं, जोड दिली. रेखीव स्वभावचित्रण कौशल्यपूर्ण कथारचना, आणि साध्या घरगुती भाषेंतील संवाद या, कोणत्याहि परिणामकारक नाट्याला अवश्य अशा प्रमुख अंगांचं गोड दर्शन त्यांनीच प्रथम मराठी मनाला सौभद्र नाटकांत घडवलं, अण्णांच्या संगीतानें लोकांची संगीताची अभिरुची उंचावली. तात्या पुणेकर त्यावद्दल म्हणतो:—

नवी केली चाल संगीताची ॥
झाली राळ इतर नाटकांची ॥
गेली किंमत नायकिणींची ॥
गाति सुस्वर पदें अण्णांची ॥

अण्णांनी योजलेलं संगीत कथानिरपेक्ष नाही, त्यामुळे गद्याप्रमाणं पद्यांतहि अभिनयाकरतां नटांना वाव मिळाला. या सर्व कारणांमुळं किर्लोस्कर हे युगप्रवर्तक आणि मराठी नाट्याचे खऱ्या अर्थानं जनक ठरतात. इतकंहि असलं तरी अण्णांच्या नाटकांचें ध्येय लोकरंजन हेंच होतं. म्हणून तीं नाटकं रंगभूमीची प्रथमावस्थादर्शक अशींच ठरतात. आणि तें तसंच असणार. कारण, त्यानंतरच रानडे, चिपळूणकर, आगरकर, टिळक वगैरे सुशिक्षित देशाभिमानी व्यक्तींनी, गुलामगिरीच्या सुखांत दंग असलेल्या समाजाला, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय वगैरे चळवळींनी हालवून जागं करण्यास सुरवात केली. अर्थात् किर्लोस्करांनंतरच्या वीस वर्षांत, प्रगतिपर समाजासमोर निरनिराळीं ध्येयं उभीं राहिलीं. म्हणूनच ध्येयाविष्कार करणाऱ्या नाटकांना रंगभूमीचा दरवाजा खुला झाला. या दरवाजांतून प्रथम श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी प्रवेश केला. दारूचे दुष्परिणाम, विषम विवाह, पुनर्विवाह वगैरे विषयांवर त्यांनी नाटकें लिहिलीं. फारशी आणि गुजराथी चाली त्यांनी संगीताला दिल्या. नाटकांत उच्च दर्जाचा विनोद आणला; आणि स्वतंत्र कथानकावर आपली नाट्यरचना केली. या सर्व वैशिष्ट्यामुळं रंगभूमीला नवीन आकर्षण लाभलं. नाट्याला हेतूची जोड मिळाली, पण त्यांच्या नाटकांतील अद्भुतरम्यता आणि रहस्यमय व गुंतागुंतीची कथारचना यामध्यें त्यांच्या नाटकांचा हेतु गडप होतो. म्हणूनच त्यांच्या हेतूप्रमाणे त्यांचीं नाटकं यथार्थतेनं ध्येयाविष्कार करणारीं ठरत नाहीत. हें श्रेय प्रथम मिळालं तें देवलांच्या शारदेला. हें नाटकहि संगीतप्रधानच आहे. पण त्यांत जरठकुमारी विवाहाचा प्रश्न अत्यंत परिणामकारकतेनं त्यांनी मांडला असल्यामुळं, या परिणामकारकतेच्या दृष्टीनं पाहतां देवल हेच, माझ्या मतं, आधुनिक सामाजिक नाटकाचे जनक ठरतात. परंतु बुद्धिवैभव व जीवनाविषयी विशिष्ट तत्वज्ञान यांचा देवलांचे ठिकाणीं अभाव असल्यामुळं शारदेपलीकडे पाऊल टाकण्यास ते असमर्थ ठरले. याच सुमारास सुदैवानं खाडीलकर आणि महाराष्ट्र नाटक मंडळी यांची युति मराठी रंगभूमीवर उदीत झाली; आणि ध्येयाविष्काराबरोबरच भावाविष्कार करणारीं नाटकें रंगभूमीवर भराभर तळपूं लागलीं. Not-failure but low aim is crime हें महाराष्ट्र मंडळीचं ब्रीदवाक्य; तर स्वतःच्या अंतःकरणांत अहोरात्र सळसळणाऱ्या, राजकीय तत्वज्ञानाचा आविष्कार करण्याचं, खाडीलकरांचं ध्येय. मग खाडीलकर आणि महाराष्ट्र मंडळी, यांच्या प्रभावी युतीमुळंच मराठी नाट्यकलेनं, आपल्या विकासाचं अत्युच्च शिखर गाठलं तर त्यांत कांहीच नवल नाही; महाराष्ट्र मंडळींतील नटवर्ग बुद्धिमान, सुशिक्षित व ध्येयनिष्ठ असा होता. त्यामुळे राष्ट्रीय भावना व राष्ट्रीय करमणूक, यांचा हृदयंगम मिलाफ, खाडीलकरांनी आपल्या नाटकांत साधला, बहुजनसमाजांत राष्ट्रीय भावनांचा प्रसार करण्याचं कार्य, केसरीपेक्षांहि जास्त प्रभावानं,

त्यांच्याच नाटकांनी केलं. वरेरकरांनीहि प्रचारकार्य करण्याचा प्रयत्न केला--करीत आहेत. परंतु खाडिलकरांप्रमाणं स्वतःचं असं जोरकस तत्वज्ञान त्यांच्याजवळ नाहीं. तत्कालीन लोकमताच्या लाटेवर त्यांचं नाटच कांही वेळ तरंगतांना दिसतं. नाटचांतील प्रतिपाद्य विषयावर त्यांची पकड शेवटपर्यंत टिकत नाही. चटकदार, विनोदपूर्ण, सुटसुटीत संवाद यांतच त्यांच्या लोकप्रियतेचं मर्म आहे. उपहास हेंच त्यांचं प्रमुख अस्त्र. प्रतिपक्षाला चूप करण्याकरतां, योग्य वेळीं केलेला उपहासाचा वापर उपयुक्त ठरतो. पण त्याचा वारंवार किंवा भलत्या ठिकाणीं उपयोग केला तर उपयोग करणाऱ्याजवळ, इतरांच्या मनाची खात्री पटवण्याकरतां जरूर अशा विचारशक्तीचं दुर्भिक्ष आहे, असा त्याचा अर्थ होतो. कुंजविहारी नाटकानं मात्र कांही काळ रंगभूमी गाजवली. याच्या उलट वीर–शृंगार–करुण–हास्य वगैरे रसांचा उपयोग, आपल्या नाटचांतील प्रतिपाद्य विषयाला उठाव देण्याकरतांच, खाडिलकरांनी केला आहे. नाटकांतील संघर्षाच्या बीजाची चटकन् पकड घेऊन, त्याचा त्वरित, तर्कशुद्ध, प्रमाणबद्ध परंतु परिणामकारक विकास हेंच त्यांच्या कथारचनेचं वैशिष्टच. त्यांच्या नाटकांतील सर्वव्यापी आणि प्रधान गुण म्हणजे "ओज." गायक म्हणजेच नट अशी एक व्याख्या पूर्वीच्या संगीतप्रधान नाटकामुळं रूढ झाली होती. खरं नाटच गद्यांत आहे; संगीत हें रसोत्कर्षाचं केवळ एक प्रभावी साधन आहे, असं आपल्या यशस्वी नाटकांनी सिद्ध करून या व्याख्येचा खाडिलकरांनीच प्रथम धुव्वा उडवला. याचा परिणाम म्हणजे गायक नटाला अभिनयाची जरूरी वाटूं लागली. संगीत नाटक लिहिणाराला गद्य भागाकडे विशेष लक्ष देणं भाग पडलं. नैमित्तिकाला नित्याचं स्वरूप देण्याची खाडिलकरांची हातोटी, त्यांच्याइतकी इतर नाटककारांत दिसत नाही. "खरे पेचप्रसंग" निर्माण करून, त्यांत कीचक, रामशास्त्री, आनंदीबाई, हरिश्चंद्र, विश्वामित्र, कच, राम इत्यादि विविध स्वभावांच्या व्यक्तींचं प्रभावी दर्शन, त्यांनी प्रेक्षकांना घडवलं. याचमुळं मराठी नाटच ध्येयाविष्काराबरोबरच भावाविष्कार करण्यास समर्थ झालं, आणि इथंच मराठी नाटचकलेचं साफल्य झालेलं आपल्याला दिसतं. खाडिलकरांबरोबरच गडकरी रंगभूमीवर चांगलेच चमकले. बुद्धीचा आणि कल्पनेचा मूर्तिमंत विलास हेंच त्यांच्या यशाचं खरं रहस्य. हा विलास, त्यांच्या अनुप्रासयुक्त भाषेंत, नाटकांतील भावनोत्कट प्रसंगांत आणि विनोदांतहि क्षणाक्षणाला प्रकर्षानं प्रगट झालेला आहे. हा दैदिप्यमान कल्पनाविलास ऐकत असतां, प्रेक्षक इतका मंत्रमुग्ध होतो की समोर रंगभूमीवर घडत असलेल्या घटनेंतील अस्वाभाविकता आणि अवास्तवता त्याच्या बुद्धीला क्षणमात्र स्पर्शहि करूं शकत नाही. मात्र याच त्यांच्या प्रतिभावैशिष्ठ्याच्या ते इतके आहारी गेले आहेत की, तर्कशुद्ध कथाविकास आणि व्यक्तिदर्शन या महत्वाच्या बाबतींत त्यांच्या नाटकांत सैलपणा आला आहे. म्हणूनच त्यांचीं नाटकें खाडीलकरांइतकी भावाविष्कार व ध्येयाविष्कार करण्यास समर्थ झालीं नाहीत असं वाटतं. माधवराव जोशांचा विनोद अश्लीलतेकडे झुकतो. परंतु हा दोष जमेस धरूनहि, गडकऱ्यांप्रमाणं, त्यांच्याहि विनोदांतील कल्पनेचा विलास पाहून प्रेक्षक थक्क होतात. मात्र त्यांचं म्युनिसिपालिटी हें गाजलेलं नाटक, त्यांतील विनोदवैशिष्ठ्यापेक्षां, त्यामधील तंत्रवैशिष्ठ्यामुळंच जास्त परिणामकारक झालं ही गोष्ट फारशी कोणाच्या लक्षांत आलेली दिसत नाही. जेव्हा एखादें सामाजिक दृश्य–म्हणजे Social aspect-नाटककाराला रंगवायचें असतें, तेव्हा सर्व नाटच त्या सामाजिक दृश्यावर त्याला केंद्रित ठेवतां आलं पाहिजे. म्हणजे कथेला मधेंमधें त्यानं फारसं लुडबडूं देतां उपयोगी नाही. याच तंत्रामुळं गॅल्सवर्दी याचे Strife हें नाटक प्रयोगदृष्टचा यशस्वी झालं. ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिटीचा कारभार हाकीत असतां, जसा व जितका वैचित्र्यपूर्ण मनुष्यस्वभाव दिसून येतो तसा व तितकाच या नाटकांत माधवरावांनी रंगविला आहे. त्याचमुळं या नाटकांत त्यांना broader appeal आणतां आलं आणि हेंच त्या नाटकाच्या प्रायोगिक यशाचं महत्वाचं कारण आहे. कोल्हटकर, गडकरी, जोशी आदिकरून लेखकांनी जी विनोदप्रथा नाटचांत आणली ती खऱ्या मराठी नाटचाच्या उठावाला बाधक ठरली. विनोदाशिवाय नाटचप्रयोग रंगणं शक्यच नाही अशी समजूत नाटचनिर्मिते व प्रेक्षक यांची होऊन बसली. नवीन लेखकांकडून विनोदाची अपेक्षा सफल झाली

नाही तर बहुतेक तें नाटक स्वीकारलें जाण्याची आशा कमीच. मग मूळ नाटयाशी कांहीहि संबंध नाही अशीं उपकथानकं, विनोदाकरतां नाटकांत घुसडलीं जाऊं लागलीं व खऱ्या नाटयाची हानि होऊं लागली. अंदाजें १९२५ पासून पाश्चात्य नाटककारांकडे तरुण लेखकांचं लक्ष लागलं. विशेषत: इब्सेनच्या तंत्राचा उपयोग इकडेहि करण्याची प्रवृत्ति दिसूं लागली. माझ्या मतें तंत्र हें व्यक्तिनिष्ठ आहे ही गोष्ट न ओळखतां, आपल्याला जमणार नाही असं इब्सेनचं तंत्र कांही लेखकांनी वापरलं, व हीहि गोष्ट चांगल्या नाटयनिर्मितीच्या आड आली. वरेरकर, वर्तक, अत्रे, रांगणेकर, इत्यादि लेखकांनी इब्सेनचं तंत्र वापरलं आहे असं म्हणतात. इब्सेनचं अस्सल तंत्र कोणतं या विषयींच्या अज्ञानामुळंच असं म्हटलं जातं. कारण "इब्सेनपेक्षा फ्रेंच नाटककार ब्रियो याच्याच तंत्राचा मी अधिक उपयोग केला आहे" असं अत्रे स्वत: म्हणतात. "अद्यापि सरलादेवीइतकें इब्सेनच्या तंत्राचें शुद्ध स्वरूपांत केलेलें अनुकरण एकाहि नाटककाराकडून झालं नाही" असं के. ना. काळे यांनी १९४१ सालीं घरकुल नाटकास जोडलेल्या प्रस्तावनेंत नमूद केलं आहे. माझीं नाटकें मी कलाविलासाठीं लिहिलीं, असं नरसोपंत केळकर स्वत:च म्हणतात—मग त्यांच्या नाटकांत हेतु किंवा ध्येयाविष्काराचा शोध घेण्यांत काय अर्थ आहे ? "उद्यांचा संसार" या नाटकानं, अत्रे यांस मानाचं स्थान मिळवून दिलं आहे. विषयाची वास्तवता, रेखीव स्वभावचित्रण, काव्यमय परंतु नाटयानुकुल भाषा ही त्या नाटकाची उत्तम वैशिष्ठ्यें आहेत. वर्तकांच्या आंधळ्यांची शाळा या नाटकाविषयीं कारखानीस एकदा म्हणाले की "त्यांतील सुशिलेचा प्रश्न हाच खरा प्रश्न आहे. बिंबाच्या प्रश्नाचं त्याला उगीच बांडगूळ जोडलं आहे." म्हणूनच या नाटकांतील तिसरा अंक अनावश्यक आहे असे उद्गार एका टीकाकाराने काढले होते. नाटयविषय नवीन व वास्तव असला तरी वर्तकांचें लेखन एकंदरींत Melodrama कडे झुकतें असं मला वाटतं. मात्र मन्वंतराच्या या नाटकाच्या प्रयोगानं प्रेक्षकांना अक्षरश: वेड लावलं यांत शंका नाही. रांगणेकरांचं सतरा वर्षें हें नाटक वैशिष्ठ्यपूर्ण आहे. ज्याला आपण इंग्रजींत Revealation of Character म्हणतो, तें शंकरराव या पात्राच्या चित्रणांत, त्यांनी अवघ्या एक तासाच्या मर्यादेंत, अप्रतिम कौशल्यानं करून दाखवलं आहे. नाना जोग यांची नाटयविषयाची निवड अद्यावत् व नाविन्यपूर्ण आहे. कथारचना व रेखीव स्वभावदर्शन याकडे त्यांनी जास्त लक्ष पुरवलं तर ते एक चांगले नाटककार ठरण्याचा संभव आहे. वरील विवेचनावरून गेल्या पंचवीस वर्षांत मराठी नाटयाची, विशेष रीतीनं नजरेंत भरेल अशी प्रगति झाली नाही असं वाटतं. कांही नाटकांनी केवळ प्रायोगिक उच्चांक गांठला इतकंच म्हणतां येईल. द्रौपदी नाटकापासून पुढे खाडीलकर हेहि तत्वज्ञानाच्या आहारीं गेलेले दिसतात. पूर्वीच्या त्यांच्या नाटकांतील विकारांच्या संघर्षाचं स्थान, विचारांच्या संघर्षानं घेतलेलं दिसतं. तरीहि स्वयंवरापर्यंतच्या त्यांच्या नाटकांमुळे, मराठी नाटयकलेनं आपल्या विकासाचं उच्च शिखर गांठलं असा निष्कर्ष मला तरी शेवटीं काढावासा वाटतो.

(नागपूर नभोवाणी केंद्राच्या सौजन्यानें)

पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार : १

इटालियन कादंबरीकार इग्नॅत्सिओ सिलोने

पां. ब. गाडगीळ

(मागे कांही वर्षांपूर्वी मर्ढेकरांनी 'वाङ्मयीन महात्मतें'त अशी तक्रार केली होती की, मराठी वाङ्मय इतकें परपुष्ट आहे की, तें पूर्णपणें परपुष्ट नाही. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की, तें एकाच परकीय भाषेच्या-इंग्रजीच्या-साहित्यावर पुष्ट आहे. आणि त्यांची ही तक्रार खरी आहे. इंग्रजी सोडून इतर युरोपीय वाङ्मयांतील लेखकांचा अभ्यास आपल्याकडील फारच थोड्या साहित्यकारांनी केलेला आढळेल. फ्रेंच, जर्मन अगर इटालियन भाषेंतील साहित्याचा अभ्यास आपल्याकडे फारसा होत नाही. इतकेंच काय, इंग्रजी भाषेंत अनुवादित झालेलें युरोपीय वाङ्मयहि फारसें अभ्यासिलें जात नाही व त्यामुळे युरोपीय वाङ्मयांतील जीवनचित्रण व विचारदर्शन आपणास ज्ञात नाही आणि आपलें वाङ्मय मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे इंग्रजीसारखें प्रगमनशून्य (conservative) होऊन बसलें आहे. मराठी वाङ्मय जर सकस व तेजस्वी व्हावयाचें असेल तर त्याला जगांतील इतर भाषांमधील तेजस्वी साहित्याचा परिचय घडावयास पाहिजे आणि परकीय भाषेंतील अग्रगण्य साहित्यकारांच्या अभिजात कलाकृतींची ओळख व्हावयास पाहिजे. 'युगवाणी' मार्फत ही 'ओळख' करून देण्याचें आम्ही ठरविलें असून आमच्या रसिक, वाचकांनी आम्हांस या संकल्पपूर्तीसाठीं लेखनसहाय्य करणें इष्ट आहे. त्यासाठीच हें सदर सुरू केलें आहे. पाश्चात्य साहित्यावरील लेखांना 'युगवाणी'त जरूर स्थान मिळेल.)

इटली देशासंबंधी मला नेहमीच आकर्षण वाटत आलें आहे. लहानपणीं मॅझिनी, गॅरिबाल्डी या इटालियन राष्ट्रभक्तांचीं चरित्रें वाचून माझी इटलीच्या इतिहासासंबंधी जिज्ञासा वाढीस लागली. महाविद्यालयांत युरोपच्या इतिहासाचें अध्ययन करतांना 'इटालियन पुनरुज्जीवना'चा विशेष अभ्यास केला होता. मुस्सोलिनी व फॅसिझम् यामुळे इटलीचें वारंवार स्मरण होत असे. परंतु इटलीच्या साहित्याकडे माझें लक्ष त्यावेळेस गेलें नव्हते. लुइजी पिरांदेल्लो व बेनेदेत्तो क्रोचे यांचीं नांवेंच फक्त माहीत होती. आजसुद्धां तशीच स्थिति आहे. परंतु अलिकडे कांही इटालियन कादंबऱ्या माझ्या वाचनांत आल्या आणि अशी कल्पना झाली की 'युगवाणी'च्या वाचकांचें आधुनिक इटालियन साहित्याकडे लक्ष वेधावें व म्हणूनच या लेखाचा खटाटोप केलेला आहे.

इग्नॅत्सिओ सिलोने हा इटलीचा अग्रगण्य साहित्यकार आहे. त्याचा जन्म १ मे १९०० रोजीं अॅपेनाईन व अॅड्रिआटिक यांच्यामध्यें वसलेल्या डोंगराळ अब्रुझी परगण्यांतील पेस्किना दि मार्सी या खेड्यांत झाला. त्याचा बाप एक लहान जमीनमालक होता. शेतमळ्यावर काम करणाऱ्या शेतकऱ्यांशी त्याचे संबंध अत्यंत प्रेमळपणाचे होते. हा अब्रुझी परगणा अनेक नामवंत साहित्यकारांची जन्मभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. प्रख्यात इटालियन कवि दान्नुंत्सिओ (D' Annunzio) व सुप्रसिद्ध सौंदर्यशास्त्रज्ञ व तत्ववेत्ता बेनेदेत्तो क्रोचे याच परगण्यांतील मूळ रहिवासी होते. १९१५ च्या

भूकंपांत सिलोनेचे आईबाप वारले व तो घरादाराला मुकला. तो व त्याचा भाऊ फक्त या भयंकर भूकंपांतून वाचले. पित्याचें मायेचें छत्र गेल्यामुळें सिलोनेनें एका सैराट जीवनाला प्रारंभ केला. भूकंपांत वाचलेला त्याचा भाऊ फॅसिस्टांच्या तुरुंगांत मेला. त्याची प्रथम पत्नी बास्कच्या उठावणींत मारली गेली. सिलोनेनें आपल्या पूर्वायुष्याबद्दल 'न पावलेला देव' (The God That Failed) या ग्रंथांत सविस्तर लेख लिहलेला असून त्यांत त्यानें साम्यवादी विचारप्रणालीचा स्वीकार व नंतर त्याग कसा केला यांचें साद्यंत वर्णन केलें आहे. वयाच्या सतराव्या वर्षीच त्याची इटलीच्या मान्यवर पुढाऱ्यांत गणना होऊं लागली. वैद्यकीच्या अभ्यासाची हौस सोडून तो एका समाजवादी (Socialist) दैनिकाचा संपादक बनला. अब्रुझी परगण्यांतील शेत–मजूरांचा तो एकमेव पुढारी होता. युद्धविरोधी निदर्शनें केल्याबद्दल त्याच्यावर खटला भरण्यांत आला होता. १९२१ सालीं इटालियन कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यांत त्याने पुढाकार घेतला होता. मुसोलिनी अधिकारारूढ झाल्यानंतर सिलोने व इतर फॅसिस्ट–विरोधक भूमिगत झाले. अज्ञातवासांत राहून त्याने बेकायदेशीर पत्रकें व वृत्तपत्रें प्रसिद्ध केलीं होतीं. परंतु अखेर फॅसिस्ट झोटिंगशाहीमुळें त्याला इटली सोडून बाहेर जावें लागलें. युरोपांतील अनेक देशांतून भटकून १९३० सालीं तो स्वित्झर्लंडमध्ये स्थायिक झाला. डेव्हॉस शहरीं राहून त्यानें आपलें लेखन केलें. स्वित्झर्लंडमध्येच त्याची दुसरी पत्नी डोरिना हिची भेट झाली. डोरिना लारासी ही आयरीश मुलगी 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून'ची वार्ताहर म्हणून काम करीत होती. ती स्वतः इतिहास व राजकारण या विषयांची उत्तम विद्यार्थिनी होती व तिची राजकीय मतें इग्नॅत्सिओच्या मतांशीं मिळतीजुळतीं होतीं. १९४४ सालीं मुसोलिनीचा पाडाव झाल्यानंतर सिलोनेला Avanti (अग्रगामी) या समाजवादी दैनिकाचें संपादन करण्यासाठी रोमला बोलावण्यांत आलें. फॅसिस्ट होण्यापूर्वी मुसोलिनी या दैनिकाचा संपादक होता.

इग्नॅत्सिओचें खरें नांव सेकन्दो त्रॅन्क्विली असें आहे. परंतु फॅसिस्टविरोधी पत्रकें लिहिण्यासाठी त्यानें हें नांव घेतलें आणि याच नांवाने तो आज जगप्रसिद्ध आहे. हें साम्यवादी परंपरेस जुळण्यासारखेंच झालें. लेनिन, ट्रॉट्स्की, स्टॅलिनप्रमाणे, तो आपल्या टोपण नांवानेंच (nom 'de plume) प्रसिद्ध आहे. त्याने समाजवादी (Socialist) पक्षोपक्षांत एकी घडवून आणली असून आजचा इटालियन समाजवादी पक्ष ब्रिटिश मजूर पक्षाप्रमाणे इंटरनॅशनलचा सभासद आहे. संध्यां तो राजकारणांतून निवृत्त झालेला असून यापुढे आपलें उर्वरित जीवन साहित्यसेवेंत व्यतीत करणार आहे. त्याने नुकतेंच उद्‌गार काढले की, 'I have left politics to get to the roots'.

फॅसिस्टांच्या हुकूमशाहींत सिलोनेचीं सारीं पुस्तकें जप्त करण्यांत आलीं होतीं. सिलोनेचें साहित्य युरोपांतील इतर देशांत जितकें वाचलें जातें तितकें इटलीमध्ये वाचलें जात नाही. लुइजी पिरँडेलोला नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतरच इटलीमध्ये प्रसिद्धी मिळाली. अलिकडे इटालियन ललित साहित्य बरेंच नांवारूपास आलें आहे. सिलोनेप्रमाणेच आल्बर्तो मोराव्हिया हाहि कादंबरीकार प्रसिद्धीस आलेला आहे. फॅसिझमच्या भयानक झोटिंगपाच्छाईमुळे अनेक लेखकांनी लेखन स्थगित केलें होते. आता इटलीमधील साहित्यिक जीवन स्वातंत्र्याने भारावून गेलें असून अनेक तरुण कवि, कथाकार, कादंबरीकार आपल्या स्फोटक साहित्याची भर घालीत आहेत. सिलोनेची १९३० सालीं प्रसिद्ध झालेली Fontamara ही कादंबरी ('श्रावणांतील खेडें' या शीर्षकाखाली त्र्यंकटेश वकील यांनी या कादंबरीचें भाषांतर केलें आहे.) इटलीमध्ये १९४५ सालापर्यंत प्रसिद्ध होऊं शकली नाही.

फॉन्टामारा हें खेड्याचें नांव असून त्यांत सिलोनेने अब्रुझी परगण्यांतील शेतकऱ्यांची जीवन-चित्रें रेखाटलीं आहेत. हुकूमशाही राजवटीचा शेतकऱ्यांच्या निरागस, शांत व स्थिर जीवनक्रमावर कसा परिणाम होतो याचें अत्यंत सुंदर चित्र सिलोनेने रेखाटलें असून त्यांतील फॅसिस्टांचा उपहास मोठा मजेदार आहे. उपहास, वक्रोक्ति व्याजोक्ति हीं इटा-

लियन लेखकांचीं प्रमुख हत्यारेंच आहेत. झोटिंगशाहीचें चित्रण करतांना सिलोनेनें कडक टीका अगर चर्चा न करतां, उपरोधानें व उपहासानें हुकूमशाही राजवटीची सर्वत्र चेष्टा केलेली आहे. या सर्वोत्तम कलाकृतीचा चोवीस भाषांत अनुवाद झालेला आहे. इटलींत परत आल्यानंतर त्यानें A Handful of Blackberries ही कादंबरी लिहिली. त्यावेळेस राजकीय चळवळीच्या धामधुमींत तिचें लेखन मंदगतीनें चाललें होतें. त्यानें असें म्हटलें आहे की, तो लिहित असतांना त्यानें ठरविलेल्या घटना नकळत वगळल्या गेल्या व कादंबरीचा प्रवाह निराळ्याच तऱ्हेने वाहूं लागला. तो म्हणतो की, One works from a vision and one cannot control one's dreams.

अॅपेनाईनच्या डोंगराळ भागांत राहणाऱ्या कृषीवलांची ही एक रम्य कहाणी आहे. हा प्रदेश सिलोनेच्या चांगल्या परिचयाचा असल्यामुळे व तेथील ग्रामजीवनाचें त्यानें चांगलें निरीक्षण केलें असल्यामुळें या कादंबरींत वर्णिलेलें प्रादेशिक जीवन यथातथ्य उतरलें आहे. रोक्को हा एक निराशाग्रस्त क्रांतिकारक या कादंबरीचा नायक आहे. एका सुंदर ऑस्ट्रियन निर्वासित मुलीवर-स्टेलावर—त्याचें प्रेम जडतें. रोक्कोवरील प्रेमामुळेच ती साम्यवादी पक्षाची सभासद बनते. रोक्को मास्कोला जातो व त्याचा साम्यवादी राजवटीसंबंधीं संपूर्णपणे भ्रमनिरास होतो व साम्यवादी विचारप्रणालीवरील त्याचा विश्वास उडून जातो. साम्यवादी हुकुमशाहीशीं त्याचा वेबनाव होतो. साम्यवादाला तिलांजली देऊन तो आपल्या खेड्यांत परत येतो व हुकुमशहाचें निर्दालन करण्यासाठी तो खेडेगावांत स्वातंत्र्याची चळवळ सुरू करतो, रोक्कोच्या रूपानें सिलोनेनें, साम्यवादाचें पालटलेलें रूप पाहून निराश झालेल्या एका युयुत्सु युवकाचें स्वभावचित्र रेखाटलेलें आहे. या कादंबरींत शेतकऱ्यांचें अकृत्रिम, साधें जीवन रंगविलेलें आहे, त्यांत कोठेहि आदर्शीकरण आढळणार नाही. शेतकऱ्यांचें खरेखुरें जीवन यांत रेखाटलेलें असून त्यांची निर्भयता, करुणास्पद दारिद्र्य, शांत आनंदी स्वभाव यांचें अत्यंत रम्य चित्रण केलेलें आहे. या कादंबरींत विनोदाचा अनिरुद्ध संचार आहे. एका टीकाकारानें सिलोनेला 'हसरा कोएस्लर' असें म्हटलें आहे आणि तें अगदीं यथार्थ आहे. कोएस्लर हा तर्कप्रधान, बुद्धिनिष्ठ विवेचक आहे, तर सिलोने हा हसतखेळत शहाणपण शिकविणारा गोष्टीवेल्हाळ आहे. कोएस्लरनें ही कथा कशी लिहिली असती याची कल्पना करणें मोठें मनोरंजक होईल.

Bread And Wine या कादंबरींतहि कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचा त्याग केलेल्या एका भग्नाश कार्यकर्त्याची कहाणी सांगितलेली आहे व तिचाच उत्तरार्ध The Seed Beneath the Snow या कादंबरींत वर्णन केलेला आहे. या कादंबरींत झोटिंगशाहींत होणाऱ्या सांस्कृतिक अधःपतनाचें व विचारसंघर्षाचें दर्शन घडविलेलें आहे. सिलोनेच्या ललित साहित्यांत राजकीय विचारांचा व घटनांचा प्रकर्ष आढळतो कारण त्याचें स्वतःचें जीवन हुकुमशाही राजवटीशीं अविश्रांत झगडा करण्यांत गेलें आहे. त्याच्या सर्वच कादंबऱ्यांत त्यानें हुकुमशाहीचें विडंबन केलेलें आहे. त्यानें केवळ कलाविलासासाठी लेखणी हातांत धरली नाही तर आपल्या राजकीय जीवनांतील एक अनिवार्य कार्य म्हणूनच त्यानें लेखन केलेलें आहे. त्याचें संपूर्ण जीवन फॅसिस्ट व कम्युनिस्ट हुकुमशाहीविरुद्ध झगडण्यांत व दलितांच्या पुढाकारांत व्यतीत झालें असल्यामुळें त्याच्या लेखनांत राजकीय दृष्टिकोण प्रामुख्यानें प्रगट होणें साहजिकच आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदत्वाचा राजिनामा दिल्यानंतर त्यानें समाजवादी चळवळीचें पुढारीपण स्वीकारलें. सिलोने कट्टर कम्युनिस्ट कधीच नव्हता. समाजवादी जीवनमूल्यांवर मात्र त्याची अढळ निष्ठा आहे. तो प्रखर स्वातंत्र्यवादी असल्यामुळे त्याच्या वाङ्मयांत अनिर्बंध स्वातंत्र्याचा जयजयकार आढळेल. सांस्कृतिक जीवनांतील स्वातंत्र्याचा तो कट्टर पुरस्कर्ता आहे. जीवनमूल्यांसंबंधी चर्चा करतांना तो म्हणतो की, जीवनमूल्यें हीं चिरकालिक आहेत. राजकीय सिद्धांतांच्या आधारावर एकादा पंथ वा पक्ष स्थापन करतां येईल पण जीवनमूल्यांच्या अधिष्ठानावर नवसंस्कृतीची स्थापना करतां येईल व नवजीवनाचा प्रारंभ करतां येईल. या जीवनमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी

अनुक्रमणिका

आटोकाट प्रयत्न करण्यांत हा तेजस्वी व निग्रही साहित्यकार नेहमीच पुढे राहील. त्याचें ललित साहित्य हें एक प्रभावी माध्यम आहे. तें स्वातंत्र्याच्या प्रीतीने फुललेलें आहे. स्वातंत्र्याचें उद्‌गायन करणारें व मानवी संस्कृतीची पिछेहाट करणाऱ्या साम्यवादी जुलुम-शाहीचा कडकडीत विरोध करणारें त्याचें वाङ्मय चैतन्यदायी व ध्येयदर्शी आहे. जीवनाशीं फारकत करणारी कला निःसत्व व वेगडी असते तर जीवनाशीं संगत करणारी कला तेजस्वी असते हें सिलोनेच्या ललित साहित्याचें परिशीलन केल्यास आपल्या प्रत्ययास येईल. मानवी संस्कृतीच्या उत्कर्षासाठी स्वातंत्र्याचा अखंड पुरस्कार करणें आजच्या साहित्यकारांचें इष्ट कार्य आहे आणि साहित्याची संजीवक शक्ति या कार्यासाठी वेचली जाईल अशी स्वातंत्र्यवादी व ध्येय-वादी लेखकांची आशा आहे.

सिलोनेचें साहित्य--

कादंबऱ्या--Fontamara, Bread and Wine, The Seed beneath the Snow, A Handful of Blackberries.

नाटकें व संवाद—The School for Dictators, And He did hide himself

कथा—Return to Fontamara.

अनुक्रमणिका

चिदंबरम् येथे भरलेल्या 'पेन' परिषदेचा वृत्तांत

प्रभाकर माचवे

['पी. ई. एन.' ही कवि, नाटककार, संपादक, निबंधकार, कादंबरीकार यांची प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय संस्था आहे. तिच्या जगभर निरनिराळ्या राष्ट्रांतून ५२ शाखा आहेत. हिंदुस्थानांत 'पेनचें' केंद्रीय कार्यालय मुंबई येथें असून हल्ली डॉ. राधाकृष्णन् हे अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू व वल्लथोल नारायण मेनन हे उपाध्यक्ष, मादाम सोफिया वाडिया व पी. जी. शहा हे निर्वेतन मंत्री अशी या संस्थेची कार्यकारिणी आहे. १६–१७–१८ एप्रिल रोजीं चिदम्बरम् येथे अन्नामलाई युनिव्हर्सिटींत या साहित्यिक संस्थेतर्फे अखिल भारतीय लेखक सम्मेलन भरलें. या प्रसंगीं 'रामायणाचा प्रादेशिक भाषांवर प्रभाव', 'लघुकथेचा प्रादेशिक भाषांतून विकास व सद्यःस्थिति', 'इंग्रजीचें भवितव्य', आणि '१९४८ ते १९५३ मध्ये प्रादेशिक भाषांतील वाङ्मयीन प्रगति' या विषयांवर १३ भाषांच्या प्रातिनिधिक विद्वानांचीं भाषणें व निबंधपाठ ठेवण्यांत आलें होतें. या परिसंवादांमध्ये 'हिंदी लघुकथा' या विषयावर १० मिनिटांचें भाषण करण्यास प्रभाकर माचवे यांस बोलावण्यांत आले होते. त्यांच्या चिदम्बरम् व मद्रासच्या साहित्यिक प्रवासाचें हें वर्णन भारतीय भाषांच्या हल्लीच्या परिस्थितीचें चित्र देणारें असल्यामुळे आम्ही मुद्दाम लिहवून घेतलें आहे. —संपादक]

मी 'पेन'चा सभासद नाही. कोणत्याहि साहित्यिक किंवा अन्य संस्थेचा सभासद नाही. साहित्य, कला इत्यादि सृजनशील जाणिवांच्या विकासासाठी त्यांचें संस्थावादापासून संपूर्ण स्वातंत्र्य मला मान्य आहे. पण २५ जानेवारीला पी. जी. शहा यांचें पत्र आलें की १८ एप्रिल रोजीं विभिन्न भारतीय भाषांतील 'लघुकथा' या विषयावर परिसंवाद होईल व मी हिंदी साहित्यावर बोलावें. त्याअर्थीं मी सरकारी नोकर असल्यामुळे आवश्यक अनुमति इत्यादि घेऊन त्यांना माझा होकार कळविला व २ फेब्रुवारीला त्यांचें परत पत्र आलें कीं प्रत्येक वक्त्याला सरासरी १० मिनिटें मिळतील व त्या अवधींत वाचण्याजोगा इंग्रजी निबंध मी तयार करून पाठविला. आता हे सर्व निबंध पुस्तकरूपाने पी. ई. एन्. छापणार आहेच. साहित्यिकांसाठी कोणत्याहि वर्गानें प्रवास करणाऱ्यांस एकीकडचें भाडें देऊन परतीचें तिकिट मिळण्याची रेल्वे कन्सेशनची सोय होतीच. दक्षिणेकडे मी प्रथमच जाणार असल्यामुळे मी तेथील तमिळ, तेलगु व मल्याळम् भाषांतील लेखकांचा परिचय वाढविण्याचेंहि मनांत ठरविलें होतें. व त्याप्रमाणें दिल्ली येथील माझ्या वास्तव्यांतील ओळखीच्या अनेक दक्षिण भारतीय साहित्यिकांकडून मी पत्रें घेतलीं व मद्रास येथे १५ एप्रिलला सायंकाळीं पोहचलों तों 'कलाईमंहळ' या तमिळ भाषेतील प्रमुख साहित्यिक-मासिकाचे दोन सहसंपादक मला स्टेशनवर भेटण्यास आले. त्यांनी की. वा. जगन्नाथन् या त्यांच्या प्रमुख संपादकांचा निरोप कळविला की त्यांनी आपली लंकायात्रा दोन दिवसांसाठी पुढे ढकलली आहे व चिदम्बरम्हून परततांना त्यांची भेट मला घेतां येईल. त्यांचे सहसंपादक का. श्री. श्री. (ज्यांनी खांडेकरांच्या सर्व कादंबऱ्यांचें तमिळ भाषांतर केलें व त्यांतील 'तूरम्नक्षत्रम्' म्हणजे 'उल्का' तीन आवृत्त्या खपलें, व माडखोलकरांचे 'नवे संसार'हि त्यांनी अनुवादित केलें आहे.) मला भेटूं इच्छीत होते.

१५ एप्रिलच्या रात्रीं मद्रासहून चिदंबरम्ला जाणारी गाडी म्हणजे लेखकांची स्पेशलच होती.

मद्रासचे व त्यांतहि तमिळ भाषेंतील लेखक विशेष होते. तेथेंच हें समजलें की, अलाहाबादहून डॉक्टर रामकुमार वर्मा हे हिंदीसाठी व मराठी लेखकांमध्ये वसंत बापट व मंगेश पाडगांवकर ही कवींची जोडगोळी मुंबईहून आली आहे. मद्रास येथे ए. व्ही. एम्. स्टूडियोमध्ये हिंदी पटकथालेखक म्हणून काम करणारे श्री. वसंत पुराणिक हे पूर्वीचे जवलपूरचे आमचे मित्रहि माझ्या बरोबर होते. ७ वर्षे मद्रासमध्ये राहून पुराणिकांच्या मराठींतहि मद्रासी हेल आले आहेत, पण त्यांचें मध्यप्रदेशी पानपट्टी–अडकित्ता–चंची यांचें तंत्र तसेंच कायम होतें. फक्त त्यांचीं नांवें बदललीं म्हणून त्यांचे 'वेत्तेली' (पान) व त्यांतहि कुंभकोणम् वेत्तेली फार गरम पान—'असोका' (सुपारी) व 'चुनाम्बू' (सुगंधित चुना); काथ तिकडच्या पानांत नसतोच—याची फार छान सोवत झाली. त्यांच्यासारख्या दुभाष्यावाचून दक्षिणभारतयात्रेंत व विशेषतः तमिलनाडमध्ये काम चालतच नाही. हिंदी किंवा इंग्रजी बोलला की रिक्षेवाला, कुली किंवा इतर व्यापारी हटकून तुम्हाला डबल भाडें किंवा किंमती सांगतील. तसे जुजवी, कामापुरते तमिळ शब्द शिकून निघणें जास्त उत्तम. उदाहरणार्थ: नेक्कु वेंडि कडिक्कमा (मला गाडी मिळेल काय ?) नेक्कु शापाडु वेणम् (मला जेवण हवें); इदि ग्राक्कु (हें महाग आहे); सम्ब नन्ना हरक्कु (फार उत्तम, फार सुंदर); नेक्कु तमिळ तिरियादु (मला तमिळ येत नाही).

मद्रासचा अत्यंत स्वच्छ व सुंदर ठेवलेला समुद्रकिनारा पाहून जेव्हा मी 'नेहरू होटल'चे मालक गुप्ताजी यांच्या मोटारींत एलुंबूर स्टेशनला पोचलों, तेव्हा ही गंमत समजली की रेल्वेट्रेनच्या अगदी नजीक प्लॅटफॉर्मवर मोटार नेण्याची सोय या 'एग् मोर' स्टेशनवर आहे. स्टेशनवर दक्षिणभारत हिंदी प्रचार सभेचे जुने कार्यकर्ते हरिहर शर्मा, स्वदेशमित्रन्'चे एक सहसंपादक, 'आनन्दविकटम्' 'साप्ताहिकाचे प्रसिद्ध विनोदी लेखक नाडोडी इत्यादि अनेक लेखकांच्या ओळखी झाल्या. ज्या डब्यांतून मी व पुराणिक चाललों होतों, त्याबरोबरच भारतीय सैन्याचे कांही अधिकारी पांडेचेरीच्या सीमारेपेवर चालले होते व त्यांच्या मनांत वरीच अस्वस्थता व धाकधूक होती. १५ तारखेचा 'हिंदू' मी वाचायला घेतला त्यांतील दोन स्तंभी मजकुराने मी चकित झालों. 'तमिळ वळर्चि कळागम्' (तमिळ साहित्य संघ) या संस्थेने तमिळ विश्वकोश १० भागांत तयार केला असून त्यांत ७५०० पृष्ठें, २०००० पारिभाषिक शब्द व ५००० अंतर्संदर्भ आहेत. अनेक चित्रांनी मंडित असा प्रथम खंड प्रसिद्धहि झाला व बाकीचे नऊ खंड फक्त मुद्रित व्हायचे आहेत. १९४८ सालीं हें काम त्यांनी सुरू केलें. दहा हजार एक रुपये अलगप्पा चेट्टियार यांनी दिले व तेवढीच रक्कम मुथिया चेट्टियार व करुमुथु त्यागराजा चेट्टियारने दिली. दोन दिवसांत एक लाख रुपये जमा झाले. एकंदर ज्ञानकोशाचा खर्च १४ लाख मानण्यांत आला. मद्रास सरकारने दरवर्षी एक लाखाप्रमाणें ५ लाख देणगी दिली; व त्यावेळचे केंद्रीय वित्तमंत्री डॉ. षण्मुखम् चेट्टियारने ३ लाख दिले व तिरुपति देवस्थानाकडून २५ हजार मिळाले. मद्रास युनिव्हर्सिटीने आपली जागा दिली. प्रथम खंडाच्या प्रकाशन समारंभांत डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार या मंत्रिमहाशयांनी सांगितलें की कॉलेजांतील शिक्षणाचें माध्यमहि तमिळ ठेवावें लागेल, इंग्रजी किंवा हिंदी नाही. ज्ञानकोशाचे बाकीचे नऊ खंड सहा महिन्यांत एकेक असे प्रसिद्ध होतील. पेरियास्वामी तूरन या प्रमुख कोशसहसंपादकाचेहि त्यांनी आभार मानले. आर. कृष्णमूर्ति 'कल्कि' साप्ताहिकाचे संपादक–खप ७५००० शेवटीं म्हणाले की जरी तेलुगु लोकांनी आम्हावर एका बावतींत कुरघोडी केली आहे आणि त्यांचा प्रांत आंध्र म्हणवितो व आम्ही मात्र अजून 'मद्रास स्टेट'च आहोंत तरी ज्ञानकोशाच्या बावतींत आम्ही त्यांच्यावर सरशी केली आहे. तेलुगु भाषेंतहि दहाखंडी ज्ञानकोश तयार होत असून पहिले दोन खंड तीन चार महिन्यांत प्रसिद्ध होतील. सीथापती हे त्याचे मुख्य संपादक आम्हाला पी. ई. एन्. मध्ये भेटले. मोतूरि सत्यनारायण या कोशाचे मुख्य सक्रिय कार्यकर्ते होत. हें सर्व या ठिकाणीं याकरता की, डॉ. केतकरांच्या ज्ञानकोशाचेंहि पुनर्संस्करण व वर्धन मराठी साहित्य–संस्थांनी हातीं घ्यावें.

चिदंबरम्‌ला सकाळीं पोचलों तेव्हा वाटेंत 'पोर्टो नोव्हो,' 'आल्फा' नांवाचीं स्टेशनें व भातशेतीचे हिरवेचार मळे व ताड-खजुरांचीं झाडें या सर्वांमुळे मुंबईच्या उपनगराची आठवण होत होती. सकाळीं एका स्टेशनवर कॉफीकरतां गर्दी झाली तेथेहि तमिळ बोलणाऱ्यांना आधी कॉफी मिळायची. कविद्वय नुकतेंच जागे झालें होतें व त्यांच्याकडून समजलें की कृ. पां. ऊर्फ नानासाहेब कुळकर्णीहि त्याच गाडींत होते व एकूण मराठीभाषिक पांच व्यक्ति आहेत हें कळलें. चिदम्बरम् ऊर्फ अन्नामलाईनगर स्टेशनावर स्वयंसेवकांची व्यवस्था होतीच. पण कुणालाच हें ठाऊक नव्हतें की एकूण किती प्रतिनिधी येणार व कोण कुठे उतरणार ! त्यामुळे अव्यवस्था व गोंधळ यांतून वाट काढत काढत शेवटीं ११-१२ वाजेपावेतों आम्हाला एलिंगो बोर्डिंगांत उतरविण्यांत आलें आहे असें समजलें. सर्व विद्यार्थी स्वयंसेवक व नोकर देखील तमिळभाषीच. त्यामुळे मोठी पंचाईत व्हायची. शाकाहारी, मांसाहारी असे दोन 'मेस' व त्यांमध्ये आंघोळीची वगैरे व्यवस्था होती. बोर्डिंगांत पंखे नसल्यामुळे प्रत्येक प्रतिनिधीला एक एक ताडाचा पंखा देण्यांत आला होता. आंघोळी आटोपल्यावरोबर पहिला कार्यक्रम म्हणजे एका मोठ्या स्टेशनवॅगनमध्ये साहित्यिकांना भरून 'चिदम्बरम्'च्या प्राचीन नटराज–मंदिराचें दर्शन करविण्याचा. या साहित्यिकांच्या जमावांत एक तमिळ गीता–भाष्यकार अत्यंत फर्डे इंग्रजी बोलणारे पण सनातनी विचारांचे गृहस्थ होते. त्यांना उडिया भाषेंतील दोन तरुण साहित्यिकांनी मिळून इतकें चिडवलें की, शेवटीं मुद्यावरून गुद्यावर घसरतों की काय अशी पाळी आली. तरुण उडिया लोक नास्तिक होते व त्यांतील एका अतिवास्तववादी कवीनें हायड्रोजन बाँबची उपमा शिवाच्या तृतीय नेत्राला व त्याचबरोबर प्रेयसीच्या वक्षभागाला दिली या 'पावित्र्यविडंबना'मुळे वाद सुरू झाला व कोणताहि वाद असो तो शेवटीं 'तमिळ भाषा पूर्वी फार मोठी व चांगली होती. हल्ली त्यामानानें वाङ्मय जरा हिणकसच; असें म्हटलें रे म्हटलें की तमिळ लेखक लोक चवताळून उठायचे. एकानें तर मला चक्क सांगितलें की हिंदी ही 'एन्थ-रेट' भाषा आहे ! तेवढा एक भाषेचा हळवा भाग सोडला की बाकी तमिळ लोक इतर बावतींत अतिशय चांगले !

चिदम्बरम्‌चें नटराज-मंदिर ख्रिस्ताब्दापूर्वी दुसऱ्या शतकाचें आहे. पतंजलि व व्याघ्रपाद या दोन मुनिवर्यांना येथे शिवदर्शन घडलें. पल्लवराजा सिंहवर्मन द्वितीयानें हें मंदिर बांधलें, तेथील शिवगौरी कुंडांतील तीर्थामुळे (तमिळमध्ये पाण्याला ब्राह्मणी शब्द 'तीर्थम्,' अन्यथा 'तन्नि') त्याचें कुष्ठ बरें झालें अशी आख्यायिका आहे. पुढे त्याचें नांव हिरण्यवर्मन झालें. नवव्या शतकापासून तेराव्या शतकापावेतों चोलराजांनीं या विराट मंदिराचें भव्य बांधकाम व शिल्प करविलें. या मंदिराजवळच मंडपम् आहे. येथे पेरिय पुराणम् लिहिणाऱ्या शैव कवि शेक्किलारचा सन्मान चोलराजानें स्वहस्तें त्याच्यावरील छत्र उचलून केला होता. या मंदिराचें एक मोठें वैशिष्ट्य असें की, प्रवेशद्वाराजवळच १०८ नृत्यमुद्रा दगडांत कोरलेल्या आहेत व येथे शिवमंदिराजवळच शेषशायी गोविन्दराजाचें विष्णुमंदिर पण आहे. या देवळांत हरिजन संत नंदनार याला सहाव्या शतकांत प्रवेश निषेध केला असतांना ईश्वरानें स्वतः दर्शन दिलें इत्यादि हकीकतींवर गोपालकृष्ण भरथियारनें अनेक गाणीं लिहिलीं व याच नन्दनारवर एक इंग्रजींत नाटक रात्रीं दाखवण्यांत आलें. सहाव्या शतकाचें ताडीचें दुकान व त्यांत भस्माचे पट्टे लावलेले व मुकटा नेसलेले, इंग्रजी बोलणारे तमिळ संत हें सर्व इतकें हास्यास्पद होतें की, एक प्रवेश पाहून जवाहरलाल नेहरू उठून गेले. या देवळांत एके काळीं ३००० पुजारी होते. हल्ली ३०० आहेत. सोन्यानें मढवलेले खांब व एका देवळाचें छत व भाविकांची सारखी लोटणारी रांग या दैवताचें जागतेपण दर्शवितें.

मंदिरांत पाय पोळून (कारण ऊन खूप होतें व प्रचंड आवारांत जोडे काढून हिंडावें लागे) आम्ही परतलों व तमिळ राष्ट्रभोजनांत सामील झालों. केळीच्या पानावर, ज्याचें निमुळतें टोक डाव्या बाजूलाच असावें, एकदा भात व सांबार, परत भात व रसम् आणि तिसऱ्यांदा भात व 'मोर' म्हणजे ताक हेंच तें जेवण. सहा दिवस दक्षिण भारतांत यापलीकडे

कांही खायला मिळालें नाही. मी हैदराबादचे डॉक्टर झोर यांना विनोदाने म्हणालोहि की, मुस्लिम विश्वासाप्रमाणे प्रथम मनुपुत्र आदम याने गहूं खाल्ला व हा त्याचा प्रथम गुन्हा येथील द्राविडजगतांत कुणी केलेला नाही हें खरें. ख्रिस्ती विश्वास ज्ञानफळ चाखण्याचा. गहूं खाल्ल्यामुळे जर आदमचें निष्कासन झालें असतें तर मग 'तम केंव्हा सरे ?' निराळ्या रीतीने लिहावें लागलें असतें. नाही का ?

१५ एप्रिलला सायंकाळीं सहा वाजतां एका सुसज्जित भव्य मंडपांत अधिवेशनास सुरुवात झाली. नेहरू या भागांत प्रथमच आले होते. त्यामुळे खेडोपाड्यांतून दर्शकांच्या झुंडी लोटल्या होत्या. दोन हजार तरी श्रोते सहज असतील. त्यांत अर्ध्या स्त्रिया. 'कळहंवरम्' (अबोलीकरतां तमिळ शब्द), मल्लि–मल्लह (मोगरा) दवणा–भरू (दवणा–मारवा) यांच्या वेण्यांनी सजेविलेले प्रलम्ब कचसंभार आणि रंगीबेरंगी रेशमी वस्त्रांनी तो श्रोतृवृंद नुसता सुगंध व सुवर्णाने खचलेला. परत येथे प्रतिनिधींना बसण्याच्या व्यवस्थेत गोंधळ होताच. पुढे आश्रयदाते, दाते इत्यादि व तमिळ लोक फक्त. आम्हा बाहेरच्या निमंत्रितांच्या खुर्च्या १८ व्या रांगेत. लंकेहून आलेले दोन तीन प्रतिनिधी बसण्याच्या व्यवस्थेबद्दल कुरकुर करत होते. कार्यक्रमास आरंभ एक जरतारी शालजोडी व खूप भस्मपट्टे कपाळावर लावलेल्या सैल अंबाड्याच्या भटजींनी एक तमिळ भाषेंत नटराजस्तुति गाऊन केला. त्यानंतर मादाम सोफिया वाडिया यांनी सर्वांना हारतुरे घातले. तीन तासांच्या कार्यक्रमांत, चार भाषणें झालीं. सी. पी. रामस्वामी अय्यर (अन्नामलाई युनिव्हर्सिटीचे उपकुलपति), जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन् व मादाम सोफिया वाडिया यांचीं भाषणें सर्व वर्तमानपत्रांतून आलींच आहेत. त्यांचा पुनरुच्चार येथें नको. मला आठवणाऱ्या विशेष गोष्टी म्हणजे रामस्वामी अय्यर यांनी केंद्रीय मंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांना विशेषेंकरून युनिव्हर्सिटीकडे ठेवण्याची विनंती. कारण हें विश्वविद्यालय तमिळ संस्कृतिसंवर्धनासाठी केवढा प्रयत्न करीत आहे ही बाब; आणि डॉ. राधाकृष्णन् यांनी या गोष्टीपेक्षां महत्त्वाची गोष्ट 'पेन' समोर आहे असें मुद्दाम सांगितलें तें होय. त्यादिवशीं व दुसरे दिवशींहि रामस्वामी अय्यर व राधाकृष्णन् या दोघाहि उत्कृष्ट इंग्रजी वक्त्यांच्या ज्या शाब्दिक फैरी व परस्पर टोलाटोली चालत होती. त्याने श्रोतृवृंदाचें यथेच्छ मनोरंजन केलें.

जवाहरलाल नेहरूंचें भाषण कळाकळीने व तळमळीने भरलेलें होतें. त्यांत रामस्वामींचा अभिनिवेश किंवा राधाकृष्णांचें शब्दबहुल वर्णाढ्य पांडित्य नव्हतें. पण अंतःकरणापासून निघालेले ते उद्गार होते. क्षणभर राजकारणी नेहरू आपली रखरखीत मरू-पंथांतील वाट सोडून साहित्यिक नेहरूंची आठवण करीत परत त्याच रूपाने लेखकांसमोर आपलें हृद्गत मांडत होते. ते म्हणाले–" हल्ली आमच्या देशांत 'प्रतिभावंतां'चें पीक आलेलें आहे. जो तो उठतो, स्वतःला व स्वतःच्या भाषेंतील लेखकांना महान् प्रतिभावान् म्हणून संबोधितो. पण खरी गोष्ट अशी आहे की ते सर्व अत्यंत मामुली व रद्दी लेखक असतात. एखादा सातव्या आठव्या कोटींतील लेखक असूं शकतो. पण हें असें यामुळे होतें की आमच्यांत खरे टीकाकार नाहीत. खरें सांगायला गेलें की लेखक भांडायलाच उठतो. आम्हाला देशांत खरे विचारवंत निर्माण करायचे आहेत. लेखकांचें या बाबतींत फार मोठें कर्तव्य आहे. वैचारिक वातावरण तेच निर्माण करतील" नेहरूंनी आपल्या भाषणांत 'भारतीय वाङ्मय' निर्माण करण्याकडे लेखकांचें लक्ष वेधलें. साहित्य-अकॅडमी व पी. ई. एन् या परस्परसहयोगी संस्था आहेत असेंहि ते म्हणाले. नेहरू असेंहि म्हणाले की, या संस्था व अकॅडेमी वगैरे शेवटीं कोणत्याप्रकारचें 'ह्यूमन मटीरिअल' या देशांत असेल त्यावर अवलंबून आहेत. नेहरूंच्या भाषणांत जगावर आलेलें विनाशाचें सांवट व हायड्रोजन बाँबच्या संकटाचाहि उल्लेख होता. डॉ. राधाकृष्णन् यांनी आपल्या भाषणांत त्या संकटावर भर दिला व लेखकांना शांतीचे ध्वजधारक व पाईकहि बनवून टाकलें. 'पॅसिफिक क्वार्टर्ली'चे प्रतिनिधि एक अमेरिकन संपादक माझ्याजवळ बसले होते. त्यांना मी या भाषणानंतर त्यांची प्रतिक्रिया विचारली असतां गंभीर चेहरा करून ते म्हणाले—"Is it true ?"

प्रथम अधिवेशनांत अमेरिका, जपान आणि पाकिस्तान या तीन देशांतील लेखकांनी आपल्या देशातर्फे सदिच्छा व्यक्त केल्या. मादाम सोफिया वाडिया यांनी अत्यंत भावनाप्रधान पद्धतीने आभारप्रदर्शन केलें.

दुसरे दिवशीं सकाळीं १७ एप्रिल रोजीं मद्रासचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांच्या हस्तें प्रदर्शनाचें उद्घाटन झालें. यांत जुने तमिळ हस्तलिखित ग्रंथ, योगिराज अरविंदांचा ग्रंथसंग्रह, पी. ई. एन्.च्या सदस्यांचे ग्रंथ वगैरे मांडले होते. येथील अरविंदांच्या ग्रंथसंपत्तीवरून मला एक गोष्ट आठवली. या सम्मेलनांत पांडिचेरीच्या अरविंद आश्रमांतून तीनचार सदस्य आले होते गुजराथीचे एकेकाळीं 'कोयाभगतनी कडवी वाणी' म्हणून प्रखर क्रांतिगीतें लिहिणारे पण आता अरविंद-शिष्य सुन्दरम् कवि पण आले होते. गेल्या पांच वर्षांतील सर्वोत्तम काव्यसंग्रह 'यात्रा' यावर त्यांना सुवर्णपदक देण्यांत आलें आहे. 'सुन्दरम्' यांच्या विचार-परिवर्तनावर मी त्यांच्याशीं बरेच तास बोललों. व त्यांची एक मुलाखतच घेतली. त्यांचें एक पेंसिल स्केचहि मी काढलें व त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली. पण तो एका दुसऱ्या लेखाचा विषय आहे.

१०-१५ वाजतां 'रामायणाचा प्रादेशिक भाषांवर प्रभाव' हा परिसंवाद डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाला शास्त्री हॉलमध्ये बसण्याची व्यवस्था अत्यंत असमाधानकारक होती व 'पी. ई. एन्' मध्ये 'पी' हें अक्षर 'पोएट्स', 'प्लेराइट्स' पुरतेंच नसून 'फ़ोटोग्राफर्स' करतांहि आहे की काय अशी कोटी प्रदर्शन उद्घाटनप्रसंगीं श्रीप्रकाशांनी केलीच होती. या परिसंवादांत सुरवातीस सी. पी. समस्वामी अय्यर २५ मिनिटें बोलले व पुढील वक्त्यांच्या भाषणाचा घाईघाईमुळे नुसता खिमा झाला. जवळजवळ प्रत्येक परिसंवादाच्या बाबतींत असेंच झालें. तेरा भाषांचे प्रतिनिधि बोलणारे व प्रत्येकी ५ ते ७ मिनिटांत ते सांगणार तें काय ? रामस्वामी अय्यरांनी कम्बरामायणाचा आधार घेऊन असें सांगितलें की, हनुमंत जेव्हा सीतामाईला भेटावयास गेले तेव्हा ते एका 'मथुरा' (मदुरेची) भाषेंत बोलले. संस्कृतांत ते बोलले असते तर रावणाला त्याचा अर्थ समजला असता, कारण रावण हा दशग्रंथी विद्वान होता. म्हणून हनुमंत तमिळमध्ये बोलले असा त्यांचा दावा होता. मदुरेंत लेखकांची एक मोठी विद्वत्परिषद हा सर्व प्रदेश जलमग्न होण्यापूर्वी भरली होती असाहि उल्लेख त्यांना प्राचीन तमिळ ग्रंथांच्या आधारें सापडला असें ते म्हणाले एकूण कम्बरामायणांत उत्तरेकडील व दक्षिणेकडील, म्हणजेच आर्य व द्राविड संस्कृतींचा संगम घडून आला आहे असें त्यांचें मत होतें. के. एस्. रामस्वामी शास्त्री यांनी 'तमिळमध्ये रामायण' या विषयावर निबंध वाचला व सांगितलें की शिवधनुष्य तोडण्यापूर्वीच रामसीतेचें प्रेम जडलें. अरुणाचल कविरायाने रामनाटक फार पूर्वी लिहिलें आहे. व रामायणाच्या कवितांचा परिणाम कुम्मी इत्यादि लोकगीतांवर आहे. एम्. व्ही. व्ही. के. रंगाचारीने तेलुगुमध्ये रामायणाच्या प्रभावावर निबंध वाचला. त्यांत पुरुषोत्तम (नीट्झशेचा सुपर-मॅन्शेन) कल्पनेचा विकास त्यांनी विशद केला. रामायणावरील अन्य निबंधांमध्ये बंगालच्या नरेंद्र देवांनी कृत्तिवासाच्या रामायणाची चर्चा केली. पंजाबीतर्फे डॉ. मोहनसिंह (नामदेवावर ग्रंथ लिहिणारे वृद्ध विद्वान) व उर्दूतर्फे हैदराबादचे अब्दुल कादिर सरवरी बोलले. मलयालमतर्फे श्रीमती बेलायुध मेनन यांचा प्रबंध होता. हिंदीतर्फे नांव डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचें छापलें होतें. पण ते न आल्यामुळे परिषदेच्या तारखांच्या पांच दिवसांपूर्वी अलाहाबाद युनिव्हर्सिटीतर्फे डॉ. रामकुमार वर्मा यांना पाचारण केलें होतें. त्यांनी आपल्या तात्कालिक भाषणांत (प्रबंध त्यांनी लिहिला नव्हता) स्वतःच्या नांवावर कोटी केली व म्हणाले की, रामायणाचा प्रभाव माझ्या रामकुमार नांवापावेतों आहे. तुळशीरामायणाची वैशिष्ट्यें कांही दोहे आळवून त्यांनी विशद केली व आधुनिक 'साकेत,' 'कैकेयी' इत्यादि काव्यांचाहि उल्लेख केला. मराठीतर्फे प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांना आपलें भाषण फार थोडक्यांत आटोपावें लागलें. मी त्या व्याख्यानाच्या वेळीं खाली मुख्य हॉलमध्ये श्री. जवाहरलाल नेहरू यांचें विद्यार्थ्यांना उद्देशून तासभर झालेलें सुश्राव्य भाषण ऐकण्यांत गढलों होतों. पण कुळकर्ण्यांचा प्रबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध होईलच. श्रोत्यांच्या मतें हा परिसंवाद अगदीच 'पडेल' झाला.

दुपारीं अडीच वाजतां गोखले हॉलमध्यें 'लघु-कथें' वरील परिसंवाद सुरू झाला. आधी केंद्रीय सरकारच्या शिक्षणखात्याचे सचिव श्री. हुमायुन कबीर यांनी परिसंवाद सुरू केला. ते म्हणाले की "लघुकथा नक्की कशाला म्हणावें याबद्दल माझ्या मनांत गोंधळ आहे. दीर्घ लघुकथा कोठे संपते व लघु कादंबरी कोठे सुरू होते हें मला अजून ठाऊक नाही. दुसरी गोष्ट म्हणजे अलीकडील भारतीय भाषांतील वाङ्मयाबद्दल मला विशेष ठाउक नाही. बंगालींत मला माहीत आहे की, लघुकथा अधिकाधिक मनोवगाहनात्मक होत जात आहे व तीवर मार्क्स व फ्रॉइडचा प्रभाव पडत चाललां आहे." हुमायून कबीर यांनी आपल्या भाषणांत टागोरांनी दिलेली लघुकथेची एक व्याख्या दिली. नदींत नावेंतून जातांजातां त्यांना खिडकींतून जें दिसलें तें लिहिलें म्हणजे लघुकथा होते. कबीरांनी पुरोगामी लेखक संघाचे ते एकेकाळीं मंत्री होते या गोष्टीचा उल्लेख केला व या गटबाजींत चांगल्या प्रतिभाशाली लेखकांना उगीच भलती ख्याति देऊन त्यांना वाईट लेखक कसें बनविलें हें त्यांनी अत्यंत तळमळीने सांगितलें. त्यांच्या भाषणानंतर बंगाली लघुकथेवरील लीला राय यांचा अत्यंत हृद्य निबंध नरेंद्र देवांनी वाईट रीतीने वाचून विघडवला. मैथिली लघुकथेवर निबंध वाचणाऱ्याने एक अशी मज़ेशीर छोटी पगडी डोक्यावर घातली होती कीं तिने सर्वांचें लक्ष वेधून घेतलें. उर्दू लघुकथेबद्दल पाकिस्तानचे प्रतिनिधि बोलले म्हणजे फक्त एकच वाक्य की— 'एकूण हिंदुस्थानांतील लघु-कथेबद्दल निबंध ऐकून असें वाटतें की येथे कांही सर्व ठीकठाक नाही. आता वेळ नाही. माझ्या देशांतील लघुकथेबद्दल मी हा निबंध सादर करीत आहे.' असें बोलून एक इंग्रजी टंकित कागदांचें पुडकें त्यांनी अध्यक्षांसमोर ठेवलें व आपल्या जागेवर ते बसले. हिंदीतर्फे मी फक्त १० मिनिटांत आपला लेख वाचला व थोडक्यांत हिंदी लघुकथेचें वय फक्त ५० वर्षे आहे व त्यांतहि प्रेमचंदांचें नांव घेतलें की अर्धी गोष्ट संपते असें म्हणलें होतें. आधुनिक लघुकथेंतहि आदर्शवादी, सौंदर्यवादी व यथार्थवादी हे तीन संप्रदाय व त्यांची परिणति मी सांगितली. जैनेंद्रकुमार, स. ही. वात्स्यायन 'अज्ञेय' व यशपाल हे तिन्ही पद्धतींचे प्रातिनिधिक लेखक मानतां येतील असें सांगून प्रेमचंदांची परंपरा कितपत व कशी यांनी राखली हेंहि सांगितलें. एकूण श्रोत्यांचा गोंगाट बराच कमी झाला होता व माझ्या वाचनानंतर अनेक लेखकांनी जिज्ञासा, पृच्छा व चर्चा मजबरोबर केली. तमिळचे भूत-कथा लेखक कुंचित-पादम् हे माझ्या खोलीवर आले व अजून ते याविषयीं पत्रव्यवहार करीत आहेत. गुजराथीतर्फे झवेरी यांचा निबंध सुंदर होता पण वेळेच्या अभावीं त्यांना तो पूर्ण वाचतां आला नाही. मराठीतर्फे रा. भि. जोशी यांनी निबंध एकीकडे ठेऊन त्याचें सार-कथन केलें. ७५ वर्षे मराठी लघुकथेचें वय. त्यांत हरिभाऊ, दिवाकर कृष्ण इत्यादींचीं नांवें सांगून आधुनिक लघुकथेच्या चर्चेत पु. भा. भावे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ व व्यंकटेश माडगूळकर यांतील शेवटच्या तिघांची त्यांनी विस्तृत चर्चा केली. फडके-खांडेकर काळाचाहि ओझरता उल्लेख केला व चोरघडे यांचा 'आइडियालिझम्' 'Callow' होता असें ते म्हणाले. एकूण स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयांत हेंच महत्त्वाचें आशास्थान आहे असें ते म्हणाले. प्रवृत्तीपेक्षा नाम–चर्चा जेव्हा ते करूं लागले तेव्हा इतर भाषिकांना ही नांवें अपरिचित असल्यामुळे त्यांचें भाषण उमगेना. व फक्त मराठी श्रोतेच एकाग्र चित्ताने ऐकतांना दिसून आले. वसंत बापटांनी रा. भि. जोशी यांचा भाषण देतांना फोटो काढण्याचा प्रयत्न केला, पण प्रकाश उलटया दिशेने येत असल्याने तें जमलें नाही. चर्चेच्या समारोपप्रसंगीं हुमायून कबीर यांनी असेंहि सांगितलें की शिक्षणखातें निवडक २५० लघुकथांचा एक संग्रह सर्व भाषांतून इंग्रजींत अनुवादित करविणार आहे.

रविवार ता. १८ एप्रिल रोजीं सकाळीं ७-३० वाजतां युनिव्हर्सिटीच्या मुख्य हॉलमध्ये सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी तासभर 'इंग्रजीच्या महत्त्वा'वर भाषण दिलें. त्यांनी म्हटलें 'हिंदी हिंदी ज्याला म्हणतां तिचें स्वरूप निश्चित काय आहे तें ठरवा. उत्तर हिंदुस्थानांतील दोन थोर पुढाऱ्यांचीं (ज्यांचीं नांवें त्यांनी मुद्दाम सांगितलीं नाहीत) हिंदींतील भाषणें एकमेकांना समजलीं नाहीत. बिहारमध्ये बोलली जाणारी हिंदी, मीरतमध्ये बोलल्या जाणाऱ्या हिंदीपेक्षा भिन्न

आहे. तुळशीदासानें अवधींत रचना केली, सूरदासानें व्रजभाषेंत व आधुनिक अर्थानें हिंदी म्हणविणारी भाषा त्या त्या बोलींपासून भिन्न आहे असें रामस्वामी अय्यर म्हणाले. त्यांच्या मतानें इंग्रजी हेंच दुय्यम शिक्षणाचें माध्यम रहावें व विज्ञान–शास्त्रांच्या अध्ययनांत आंतरराष्ट्रीय पारिभाषिक शब्दावली अवश्य राखावी. त्यांना पांडिचेरीचे डॉ. इंद्रसेन यांनी पाठिंबा दिला. योगिराज अरविंदांनी आपलें लेखन इंग्रजींत केलें, त्याचप्रमाणे जवाहरलालजींची आत्मकथा इत्यादींचा त्यांनी हवाला दिला. ही चर्चा विशेष रंगली नाही. मात्र या चर्चेनंतर एक ठराव मादाम सोफिया वाडिया यांनी वाचला की, प्राथमिक शिक्षण व दुय्यम शिक्षण प्रादेशिक भाषांतून, राष्ट्रभाषा म्हणून हिंदी व आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी इंग्रजी अवश्य ठेवावी असें एकूण परिषदेचें मत आहे. मतमोजणीचा प्रश्नच नव्हता. प्रतिनिधी कंटाळून इकडेतिकडे व्हरांड्यांत गप्पा मारत होते व फारच तुरळक होते. यानंतर १९४८ ते १९५३ या कालखंडांत (कारण पी. ई. एन्. चें हें तिसरें अधिवेशन सात वर्षांनंतर भरलें होतें.) विभिन्न प्रादेशिक भाषांतील साहित्यिक प्रगतीवर प्रातिनिधिक भाषणें झालीं. पंजाबी भाषेचा निबंध अमृता प्रीतम या कवयित्रीनें लिहून धाडला होता तो चित्रा देसाईनें वाचून दाखविला. उर्दू भाषेचा निबंध डॉ. झोर, हैदराबाद यांनी वाचला. मल्याळी भाषेचा निबंध वाचून दाखविण्यांत आला. उडिया भाषेबद्दल जीवन कृष्णदास बोलले. इंग्रजी भाषेवर बोलणारे डॉ. के. आर. श्रीनिवास अय्यंगार जणुं झोपेंत बोलत होते असें वाटत होतें. हिंदी भाषेबद्दल नांव श्रीपतराम यांचें होतें पण ते न आल्यामुळे त्यांचा निबंध कुणीच वाचून दाखवला नाही. डॉ. रामकुमार यांनी फक्त अशा आशयाचें भाषण केलें की हिंदीमुळे इतर प्रादेशिक भाषांना मुळीच भीति नको इत्यादि. हिंदींत सर्वांगीण आशातीत प्रगति होत आहे असेंहि ते म्हणाले. मराठीवर मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी लिहिलेला प्रबंध मोठा होता पण तेथे तो वाचावयास वेळ नसल्यामुळे त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळांत काव्य व लघुकथा या क्षेत्रांत विशेष प्रगति झाली असें सांगितलें, काव्यांत मर्ढेकर व रेगे यांच्या वैशिष्ट्यांचा त्यांनी उल्लेख केला. लघुकथेंत पूर्वीचेंच रा. भि. जोशांनी सांगितलेलें चतुष्ट्य वर्णन कादंबरींत श्री. ना. पेंडसे यांचा त्यांनी उल्लेख केला. तंत्रावर मात्र भर दिल्यामुळे कादंबरी कृत्रिम बनली झाली हेंहि त्यांनी विशद केलें व रंगभूमीच्या ऱ्हासाचें मार्मिक चित्र रेखाटलें. मराठी वाङ्मयांतील इतर अंगांचा उल्लेख करण्यास त्यांना वेळ मिळाला नाही असें दिसतें. राजाध्यक्ष कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक आहेत व 'निषाद-शर्म'-च्या ठेक्यांत, लकबींत व त्याच सरावाने ते उत्तम इंग्रजी बोलतात व लिहितात. येथेहि श्री. वसंत बापट यांनी राजाध्यक्षांची एक 'छबी' काढली. या परिसंवादांतहि पुनः लघुकथेप्रमाणेच तमिळ भाषेला जास्त वेळ देण्यांत आला, व तेलुगुभाषी जेव्हा आपली वाङ्मयीन प्रगति सांगत होते तेव्हा श्रोत्यांपैकी अधिकांश तमिळभाषिक उठून चालूं लागले. मद्रास येथील 'वाणी' (रेडियोचें तेलुगु मासिक)चे संपादक जानकीरामन् त्यावेळीं माझ्याजवळ होते. ते म्हणाले की, हें दृश्य इकडे नेहेमीच्या परिचयाचें आहे. रेडियो-साठी रामायण, लघुकथा व इंग्रजीचें भवितव्य या तीन परिसंवादांपैकी कांही अंश वेगळे रेकार्ड करण्यांत आले. हुमायून कबीर, मी, रा. भि. जोशी, मलकानी व वेट्टिअर यांचे लघुकथेवरील परिसंवाद पी. इ. एन्. डायरी या नांवाने सोमवार ता. १९ रोजीं रात्रौ मद्रास, दिल्ली व अन्य कैक रेडियोकेंद्रांवरून प्रसारित करण्यांत आले.

१८ ला दुपारीं अनौपचारिक बैठकींत परस्पर परिचयाचा कार्यक्रम जाहीर करण्यांत आला होता पण मादाम फार थकल्यामुळे आधी एक उपदेश देऊन त्या निघून गेल्या. पी. जी. शहांच्या अध्यक्षतेखाली पी. ई. एन्.च्या संघटनेविषयी प्रश्न विचारांत निघाले. श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांनी पी. ई. एन. 'हूज् हू' ही पुस्तिका वाटली. डॉ. व्ही. राघवन् यांनी युरोपांत व अमेरिकेंत भारतीय लेखकांचीं पुस्तकें पोंचत नाहीत व त्याकरतां लेखक प्रकाशकांनी मिळून कार्य करावें असें सुचविलें. बंगालचे प्रतिनिधि नरेन्द्र देव यांनी संस्थेंतील आंतील भानगडी बाहेर काढल्या. जबलपूरचे

लुरेन्स नांवाचे प्रोफेसर असें म्हणाले की, पी. ई. एन्. बुलेटिनचें हल्लीचें स्वरूप सुधारून वाढवावें. हल्ली नागपूरचे कुणी गृहस्थ (आनंदराव जोशी) त्यांत फक्त 'कुसुमावती,' 'कोळते' यांचेच उल्लेख करतात. ते मराठी-बद्दल प्रातिनिधिक असें लिहीत नाहीत असें त्यांचे मराठी मित्र त्यांना सांगतात असें ते म्हणाले. या निमित्तानें कां होईना नागपूरचा तेथें नामोल्लेख झाला. 'बदनाम भी होंगे तो क्या नाम नहीं होगा ?' पेन-परिषदेचें हें शेवटचें अधिवेशन अत्यंत नीरस, वेचव, उत्साहशून्य व कंटाळवाणें झालें. परत रामस्वामी अय्यर यांचें लांबलचक आभारप्रदर्शनाचें भाषण व पी. जी. शहा यांचें आभारप्रदर्शन वगैरे औपचारिक वक्तृत्वांत दोन तास फुकट गेले. या परिषदेंत रुक्मिणी अरुंडेल यांच्या कलाकेंद्रातर्फे भरतनाट्यम्मध्ये 'कुमारसंभवम्' मूळ संस्कृत श्लोकपाठावर तीन तास नृत्याचा अत्यंत बहारीचा कार्यक्रम १८ रोजीं रात्रौ दाखविला. यांत रुक्मिणीदेवी स्वतः पार्वतीची भूमिका करतात. कर्नाटक संगीताचे हेल थोडेसे कंटाळवाणे वाटले. बाकी त्यांतील संगीताची भर कमी करतां आली असती तर तो आणखीनहि छान झाला असता. नेहरूजी या कार्यक्रमांत रात्रौ ९ ते १२ वाजेपावेतों दर्शकांत बसून होते. चेट्टियार यांच्यातर्फे व नंतर रामस्वामी अय्यरतर्फे दोन मोठाल्या चहापार्ट्या (ज्यांत कापलेलीं टरबुजं व टॉफी-पेपरमिटाच्या गोळ्याहि होत्या) दोन आणखीं वैशिष्ट्यें होत. यांतून ऐकलेली तमिळ भाषेची माहिती अशी की तमिळ भाषेंत संस्कृतच्या शब्दांचीं जीं कांहीं अर्थान्तरें झालीं आहेत तीं फार गमतीदार आहेत. 'संसार' म्हणजे तमिळमध्ये बायको—ज्याप्रमाणे आपण मराठींत कुटुंब असें म्हणतों. 'अवसर' म्हणजे 'अत्यंत शीघ्र वा जलद' 'वाघन' म्हणजे वाहन व 'पुत्तम्' म्हणजे चुंबन !

१८ ला रात्रौ आम्ही चिदम्बरमहून निघालों तेव्हा निरनिराळ्या भाषांतील कैक लेखकांचे व आमचे खूप घनिष्ट मैत्रीसंबंध झालेले होते. तेलुगु, उडिया, गुजराथी, मैथिली, उर्दू, सिंधी, तमिळ या सर्व भाषांतील लेखकांशीं मी खूप गप्पा मारल्या व ओळखी करून घेतल्या. आमच्या मराठीभाषिक प्रतिनिधींत टिकेकर मात्र भिन्न प्रकृतीचे गृहस्थ दिसले. नानासाहेब कुळकर्णी तंजावरकडे हस्तलिखितांच्या शोधार्थ जाणार होते. रा. भि. जोशी यांस मी विचारलें की तुम्ही उर्दू लेखकांत साम्यवादी कृशनचंदर यांच्याच गोष्टींचें विशेषेंकरून भाषांतर कां करतां, तर ते म्हणाले की 'मी इतरहि लेखकांचीं भाषांतरें केलीं आहेत. उदाहरणार्थ ज्ञ आदत हसन, मंटो, इस्मत चुगताई, कन्हैयालाल कपूर वगैरेंचीं. कृशनचंदरच्याहि जुन्याच गोष्टी श्रेष्ठ आहेत. व गेल्या तीन वर्षांत कृशनचंदरने कोणतीहि उत्तम गोष्ट लिहिली नाही असें ते म्हणाले.

अशा रीतीने चिदम्बरम्ची परिषद मोठी मजेत संपली. येतांना २०–२१ रोजीं मी मद्रास येथें गेलों होतों. तेथील म्युझियम व आर्ट गॅलरी पाहिली. आर्ट गॅलरी फारच भुक्कड आहे. आर्टस्कूलचे प्रिंसिपॉल विख्यात चित्रकार देवीप्रसाद रायचौधुरी यांची दोन तास मुलाखत घेतली व त्यांचा 'मिनियेचर गार्डन' व शिल्पकृती, चित्रें इत्यादि पाहिलीं. देवीप्रसादसारखे चित्रकार विरळे आहेत. ते उत्तम शिकारी, पैलवान, गाण्याचे दर्दी, मस्त खाणारे, बागबगीच्याचे शौकीन, खूप हिंडलेले, सशक्त कलमेचे व स्वतंत्र वृत्तीचे चित्रकार आहेत. बिहार सरकारने त्यांना १९४२ च्या गोळीबारांत ठार झालेल्या विद्यार्थ्यांवर 'हुतात्म्यांचें स्मारक' हें एशियांतील सर्वांत मोठें शिल्प तयार करण्यास एक लाखाचें कमिशन दिलें आहे. जुलैमध्ये ते टोकियो येथें चित्रकारांच्या आंतरराष्ट्रीय सेमिनारमध्ये अध्यक्ष म्हणून जाणार आहेत. याशिवाय मी 'अय्यप्पन' नांवाचें एक पौराणिक तमिळ नाटक पाहिलें—नवाब राजमाणिक्कारच्या नाटकमंडळींत २०० लोक आहेत व त्यांत बच्चेच जास्त. पण ट्रिक्सीन व रंगीत दिवे व एकंदर सेटिंग्ज अगदी सिनेमाचा आभास उत्पन्न करणारें आहे. पद्यांच्या चालींवर हिंदी सिनेमागीतांचा व मराठी नाटकांचा प्रभाव खूपच आहे. नाट्यवस्तु मात्र अगदींच जुन्या काळच्या आपल्या ललितांसारखी—पात्रपरिपोष सामान्य—मात्र भाविक रसिकांची व त्यांतहि विशेषेंकरून स्त्रियांची गर्दी अलोट.

मद्रास येथे मी 'कळाहमहळ' व 'कल्कि' या दोन तमिळ वर्तमानपत्रांच्या कचेरींतून गेलों होतों. तेथे

कांक तमिळ लघुकथालेखकांचा व अनुवादकांचा परिचय करून घेतला. दक्षिण भारत हिंदी प्रचारसभेंत २० रोजीं सायंकाळीं डॉ. रामकुमार वर्मा व माझा सत्कार करण्यांत आला. तेथे मी 'प्रयोगवाद' विषयावर बोललों व सभेंतील श्रोतृवृंदाचें विचार-प्रश्नोभन यथामति केलें. आनंदविकटमचे सहसंपादक 'नाडोडी' शेवटीं तमिळमध्ये आभार देण्यास उभे राहिले व म्हणाले कीं "हिंदींतहि विनोद असूं शकतो हें माचवे यांचें भाषण ऐकून आम्हांला पटलें. राजाजींनी असें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, हिंदी ही जोडयासारखी आहे. तिचा उपयोग बाहेर फिरतांना फार होतो. पण घरांत आल्यावर ती आपण माजघरांत किंवा स्वयंपाकघरांत आणत नाहीं. बाहेर योग्य ठिकाणीं काढून ठेवतों." त्याअर्थी प्रत्येक उत्तर हिंदुस्थानी लेखकानें दक्षिणेकडील एक भाषा अगत्यंकरून शिकावी असेंहि ते म्हणाले. एकूण साहित्यिक अनुभवाच्या दृष्टीनें माझी ही यात्रा फार मजेदार झाली. यांतच मी २०-२५ व्यंगचित्रें विविध प्रसंगीं व्यक्तींची व कांहीं मूर्तींचीं रेखाचित्रेंहि सोबत आणलीं आहेत. दक्षिणेकडे पुन: जाण्यासाठीं एवढी एक आठवड्याची यात्रा चांगल्या प्रस्तावने ('अॅपेटाइझर') सारखी आहे.

— —

कै. श्रीमती क्षमाबाई राव

गेल्या महिन्याच्या २२ तारखेस गुरुवारीं पंडिता क्षमाबाई राव यांचें निधन झालें. श्रीमती क्षमाबाई राव या कै. डॉ. राघवेंद्र राव यांच्या पत्नी व सुप्रसिद्ध संस्कृत पंडित रावबहादुर शंकर पांडुरंग पंडित यांच्या कन्या होत. पित्याचें संस्कृत प्रेम त्यांच्यामध्ये उतरलें होतें. त्यांनी संस्कृतांत १९३१ सालीं 'सत्याग्रह गीता' हें खंडकाव्य लिहिलें. त्याचें इंग्रजी भाषांतर दोन खंडांत प्रसिद्ध झालेलें आहे. या खंडकाव्यरचनेमुळेच त्यांना 'पंडिता' ही सार्थ पदवी देण्यांत आली होती. १९५२ सालीं संस्कृतांत लिहिलेलें 'श्री तुकाराम चरितम्' हें महाकाव्य आंतरभारतीय पारितोषकास पात्र ठरलें. याशिवाय 'कथा पंचकम्' 'शंकर जीवनाख्यानम्', 'रामदासस्वामी चरितम्', 'मीरा लहरी' हे संस्कृत ग्रंथ त्यांनी लिहिलेले आहेत. 'मीरा लहरी'चा इंग्रजी भाषेंत अनुवादहि झालेला आहे. याशिवाय त्यांनी इंग्रजींत कथा आणि नाटकें लिहिलेलीं आहेत. अनेक वर्षांपूर्वी त्यांनी 'रत्नाकर' मासिकांत अत्यंत सुंदर कथा लिहिल्या होत्या. त्यांचा संग्रह मात्र निघालेला नाहीं. त्या कथांचा संग्रह निघाल्यास क्षमाबाईंचें कथालेखनपटुत्व मराठी रसिकांच्या प्रत्ययास येईल. त्या काळीं मराठी वाचक त्यांच्या कथांची आतुरतेनें वाट पाहात असत.

पंडिता क्षमाबाईंचें लेखन-पाटव जितकें भूषणास्पद तितकेंच त्यांचें क्रीडापाटवहि विलोभनीय होतें. त्या उत्तम टेनिसपटु होत्या. स्वत:ची कन्या लीला हिला घेऊन त्यांनी हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर विजय मिळविला होता. त्यांची कन्या सौ. लीला दयाल ही स्वतः नामांकित टेनिस खेळाडू आहे.

पंडिता क्षमाबाईंच्या मृत्यूमुळे महाराष्ट्र एका कवयित्रीला व प्रागतिक विचारसरणीच्या श्रेष्ठ विदुषीला मुकला यांत शंकाच नाहीं. गीर्वाणवाणीचा वरदहस्त असलेली कवयित्री, कथालेखिका व 'पंडिता' महाराष्ट्रास पुनः लाभणें दुर्घटच आहे.

त्यांच्या कन्या सौ. लीला दयाळ व सौ. पद्मा देशिकाचारी यांच्या दुःखांत आम्ही सहभागी आहों.

ग्रंथ समालोचन

१. माणुसकीचा धर्म

[लघुकथासंग्रह; लेखक–प्रा. म. ना. अदवंत; प्रकाशक–दयार्णव कोपर्डेकर पुणें २]

प्रा. म. ना. अदवंत यांचा वाचकांना समालोचक व लघुनिबंधकार म्हणून परिचय आहेच. आतां 'माणुसकीचा धर्म' या आपल्या लघुकथा संग्रहाबरोबर ते वाचकांपुढे लघुकथालेखक म्हणून येत आहेत. निरनिराळ्या नियतकालिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या सात कथांचा प्रस्तुत संग्रहांत समावेश करण्यांत आला आहे. त्यांतील शेवटली कथा 'बेकारीचा बळी' ओ–हेन्रीच्या एका प्रसिद्ध कथेवरून स्फुरली असल्याचें लेखकांनी नमूद करून ठेवलें आहे. संग्रहांतील इतर सहा कथा स्वतंत्र आहेत व पुस्तकाचें मूल्यमापन करतांना त्यांचाच परामर्श घ्यावा लागेल.

या संग्रहाचें चटकन् डोळ्यांत भरणारें वैशिष्ट्य असें कीं त्यांतील या सहा महत्वाच्या कथा एकाच वातावरणांतून–शाळेच्या वातावरणांतून, शिक्षकांच्या जीवनांतून निर्माण झाल्या आहेत. शिक्षकांच्या जीवनांतील निरनिराळ्या आशा–निराशांची, संघर्षांची वाचकांना पानापानावर माहिती मिळते असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही. शिक्षकांचें जीवन प्रामाणिकपणें चित्रित करण्याचा प्रयत्न वाचकांच्या सहज लक्षांत येतो. सामान्यतः आजकाल शिक्षकाचें जीवन म्हणजे असमाधान, वैफल्य, अपमान, दारिद्र्य, असहाय्यता व अगतिकता इत्यादींनी पछाडलें आहे व तोच सूर कथांतून निघणें स्वाभाविक व वास्तवदर्शी आहे. 'माणुसकीचा धर्म' या कथेंत जात्यंध दंगेखोरांच्या तावडींत सापडलेल्या काकडे मास्तरांना 'माणूस' म्हणून मिळणारा गफूर किंवा शाळेंत असतांना उनाडक्यांपासून वाचविण्याचे उपकार स्मरणारे 'विचित्र सूड' या कथेंतील डॉ. गोडबोले अशीं माणसें व असें प्रसंग एकंदरीने शिक्षकांच्या आयुष्यांत कमीच. एरवी हुकुमशाहीविरुद्ध बंड करूं इच्छिणारे पण परिस्थितीनें नडलेले 'महागाई भत्ता' या कथेंतील देशपांडे मास्तर, केवळ अधिकाराच्या जोरावर शिक्षणासारख्या कठीण विषयावर बोलणाऱ्या नालायक माणसांना विरोध करण्याचें स्वप्न पाहणारे, पण परिस्थितीपुढे हरलेले 'अखेरची आहुती' मधील आपटे मास्तर, हेच खरे शिक्षकवर्गाचे प्रतिनिधी व ते अदवंतांनी प्रामाणिकपणे वाचकांना सादर केले आहेत. या दृष्टीने या संग्रहांतील कोणतीहि कथा उल्लेखितां येईल. 'फाटका पतंग' ही कथा विशेष उल्लेखनीय वाटते. तथापि रुचिपरत्वें संग्रहांतील कोणतीहि कथा वाचकाला आवडल्यास नवल नाही; साधारणपणे या सर्व कथा एका विशिष्ट पातळीवरून लिहिल्या गेल्या आहेत.

वस्तुदर्शन हा या संग्रहाचा जसा एक गुण आहे तसाच त्याच्या अतिरिक्त उपयोगामुळे तो कांही ठिकाणीं मारकहि ठरला आहे. कथेंतील वास्तवदर्शन जसें कलात्मक हवें तसें तें नाही हें जाणत्या वाचकाला खटकतें. कलात्मक सत्य व केवळ वास्तव ओळखण्यांतच लेखकाने आपलें व्यक्तित्व प्रगट करावयाचें असतें. या व्यक्तित्वाचा आविष्कार लेखकाची भाषाशैली, दृष्टिकोन इत्यादींतून आपोआप होत असतो. त्या दृष्टीने हा संग्रह अपेक्षा पूर्ण करीत नाही. याचीं दोन कारणें संभवतात. चित्रणासाठी घेतलेल्या जीवनपटांत बीजभूत असलेल्या भावनांचा मागोवा घेणें व त्यासाठी रूढ कथनपद्धतिला आवश्यक तेथें टाळून त्या भावनांना अनुरूप अशी कथनपद्धति स्वीकारणें ही पहिली अट लेखकाने पाळलेली दिसत नाही. त्याऐवजी घटनाप्रधान कथांतील चमत्कृति, जुळवून आणलेलें नाट्य, कलाटणी इत्यादींनी बनलेल्या तंत्राचा लेखकाने भरपूर उपयोग केला आहे. कथांची वाचनीयता वाढविण्यासाठी

लेखकानें या तंत्राचा वापर केला आहे हें उघड आहे पण त्यामुळें कथांतील भावविश्व खुरटल्यासारखें वाटतें.

'माणुसकीचा धर्म' हा संग्रह वाचून संपल्या-नंतर एक परिणाम वाचकांच्या मनावर राहतो व तो म्हणजे संग्रहाची 'निर्मळता.' पुष्कळशा वाचकांना 'निर्मळ' वाङ्मय हवें असतें. या त्यांच्या मागणींत कलादृष्टचा किती तथ्य आहे हा एक वादाचा प्रश्न आहे. पण कांही वाचकांना सोज्वळ, निर्मळ असें लिखाण हवें असतें व तशी मागणी करण्याचा त्यांना वाचक म्हणून हक्क असतो. अशा अनेक वाचकांचे प्रस्तुत कथासंग्रह समाधान करील असा विश्वास वाटतो.

के. ज. पुरोहित

२. अंजनी

[ग्रामीण जीवनावरील कादंबरी; लेखकः–के. नारखेडे; प्रकाशकः–र. वा. आंद्रे, श्रीलेखन वाचन भांडार, पुणें २]

असहकारितेची चळवळ सुरू होतांच कादंबरीचा नायक गणूभाऊ कॉलेज सोडून आपल्या खेडेगावांत डोंगरगावीं परत येतो व ग्रामसुधारणेचें कार्य हातीं घेतो. तीस वर्षे डोंगरगावचे पोलिसपाटील असलेल्या जाना पाटलाच्या सल्याशिवाय डोंगरगावचें पान हालत नसें. पहिल्याच प्रकरणांत गणूभाऊ जाना पाटलाच्या निर्विवाद मोठेपणाला गावांतील पंचायतींत शह देतो. जाना पाटील व डोंगरगावचा सावकार मंगा महाजन व कादंबरीचा नायक गणूभाऊ, त्याचा परममित्र राजाराम ह्यांच्यांतील संघर्षानें कादंबरीला कथानक पुरविलें आहे. कथानायकावर व त्याच्या संबंधित लोकांवर एकामागून एक संकटें खलनायक जाना पाटील आणतात. कथानायिका अंजनी ही राजारामाची बहीण व माधवरावाची बायको. माधवरावाला भुलवून जाना पाटील त्याचें लग्न मंगा महाजनाच्या मुलीशीं मैनेशीं लावून देतात. व त्याच्याकडून अंजनीला घटस्फोट देववितात. अंजनी मोठ्या धैर्यानें हा प्रहार सहन करते. व आपल्या वैद्यकीय ज्ञानाला पुस्तकांच्या साह्यानें उजाळा देऊन डोंगरगावाची सेवा करण्याचें व्रत अंगीकारुन डोंगरगावची ताईमाई होते. पुढें जंगल सत्याग्रहांत गणूभाऊ, राजाराम, व अंजनी पकडले जातांच जाना पाटलाच्या कारवाईला ऊत येतो. पण भूमिगत झालेला राजाराम ह्या सर्व कारवाईला पुरून उरतो. सुरवातीला खलनायकाच्या बाजूला असलेला मंगा महाजन अंजनीनें आपल्या सवतीचे मैनेचें बाळंतपण परोपकारी वृत्तीनें सुखरूप रीतीनें पार पाडतांच कथानायकाच्या पक्षाचे होतात. व जाना पाटलांनाहि आपल्या खलकृत्यांपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. जाना पाटील मात्र अखेरपर्यन्त निर्भेळ खलनायक राहून शेवटीं राजारामाच्या सूडाला बळी पडून आपलीं हाडें निखळवून घेतात. तुरुगांतून सुटका झाल्यावर गणूभाऊचें गावांत वर्चस्व वाढतें. ग्रामसुधारणेच्या त्याच्या कायाला मूर्त स्वरूप येऊं लागतें. कादंबरीच्या शेवटीं कथानायकाची पत्नी सारजा वारते आणि कथानायक आणि अंजनी ह्यांच्या सूचक व मूक प्रेमाचें पर्यवसान त्यांच्या लग्नांत होणार अशा अपेक्षेत वाचक असतानांच कथानायक निग्रहानें लग्न करण्याचें नाकारतो व वर्धेला महात्माजींच्या मार्गदर्शनाखालीं आपलें उर्वरित आयुष्य घालविण्या-साठीं निघून जातो.

कादंबरीची रूपरेषा ही अशी आहे. सुरवातीला नीरस वाटणारी कादंबरी जाना पाटील व राजाराम ह्यांच्या झटापटीमुळें अनेक नाट्यपूर्ण प्रसंगांतून वाच-काला नेत असल्यामुळें वाचनीय होते. भाषा साधी आणि कथानकाला साजेशी आहे. अंजनीच्या स्वभाव-चित्रांत लेखकानें बरेंच यश मिळविलें आहे.

कादंबरीलेखनाचा पहिला प्रयत्न असला तरी वाचकांच्या अपेक्षा जागृत करण्याइतका तो साधला आहे.

असें जरी असलें तरी कादंबरींतील सर्व पात्रांचीं मनें नागर असल्याचें स्पष्टपणें दृष्टीस पडतें. जाना पाटलांच्या वैयक्तिक मोठेपणाला मिळालेला शह व तो कायम ठेवण्याची त्यांची धडपड हें कादंबरीच्या सर्व नाट्यपूर्ण प्रसंगांचें मूळ असल्यामुळें कादंबरीची उंची एका ग्रामीण स्टंट बोलपटाच्यावर क्वचित् गेलेली

आढळते. पात्रांच्या स्वभावविशेषांतून प्रसंगांची घडण आपोआप होत गेलेली नसून त्याच्यामागे असलेली लेखकाची लेखणी स्वतःला लपवूं शकत नाही. त्यांतूनच निर्भेळ खलनायक जाना पाटील व तितकाच निर्भेळ कथानायक गणूभाऊ ह्यांची अनैसर्गिक वाटणारीं पात्रें निर्माण झालीं आहेत. अंजनीचें पात्र मात्र ह्याला थोडेसें अपवाद आहे. सवतीचें बाळंतपण कठोर कर्तव्यबुद्धीने सुखरूप करणारी परित्यक्ता अंजनी सारजा मेल्यानंतर गणूभाऊशीं लग्न करण्याची आपली इच्छा लपवून ठेवूं शकत नाही असें दाखवून लेखकाने तिच्या स्वभावचित्राला मनोज्ञ उठाव दिला आहे.

सर्व पात्रें खेड्यांत वावरतात व कादंबरींतील घटना खेड्यांतच घडूं शकतात म्हणून कादंबरीला ग्रामीण म्हणावयाचें असेल तर म्हणतां येईल. पण ग्रामीण जनतेच्या सुखदुःखाचें चित्रण मात्र कादंबरींतील पात्रांच्या वैयक्तिक सुखदुःखापुरतेंच मर्यादित आहे. नाही म्हणावयास लेवा पाटीदार समाजांतील सत्पंथावर खेड्यांतील पंचायतीने घातलेल्या बहिष्काराचा प्रसंग कादंबरीच्या दृष्टीने ठिगळ लावण्यासारखा दिसत असला तरी त्याच्या सामाजिक परिणामामुळे अतिशय महत्वाचा होता. पण राजारामाच्या कुटुंबावर त्यामुळे पडलेल्या बहिष्कारापुरताच लेखकाने त्याचा उपयोग करून घेऊन तो प्रश्न तिथेच अर्धवट सोडून दिला आहे. मंगा महाजन सावकार असला तरी त्याच्या सावकारीचा कादंबरींत कुठेच संबंध येत नाही, व त्यामुळे ग्रामीण जनतेशीं त्याचे असलेले संबंध दुर्धांतच राहतात. गणूभाऊने केलेली ग्रामसुधारणा जुजबी स्वरूपाची वाटते, व तिचें वर्णन करण्यास दोनतीन परिच्छेद लेखकाला पुरेसे वाटतात. माधवरावाचें पात्र म्हणजे एक निर्जीव पुतळा वाटतो. पात्राकरवीं लेखक त्याला वाटेल तसा हलवतो. विशेष कारण नसतांना लग्नाच्या बायकोला तो सोडचिठ्ठी देतो. तसेंच न्यायाधीश माधवरावाला आपल्या जागेचा उपयोग करून अंजनीवरचा खटला न्यायालयांतून काढावयास लावून नैतिक मूल्यांविषयी आपली अनास्था लेखकाने प्रगट केली आहे असें वाटल्यावाचून राहत नाही.

खेडेगावांतील घटनांचें, स्थळांचें, व निसर्गाचें चित्रण प्रामाणिक आहे. अद्‌भुतरम्य घटनांमुळे व ठोकळेबाज पात्रांच्या योजनामुळे कादंबरी साधारण प्रतीची ठरत असली तरी नायिकेच्या बऱ्याच अंशीं सफल झालेल्या मनोज्ञ व्यक्तिचित्रणामुळे लेखकाच्या पुढील कृतींविषयी मात्र अपेक्षा निर्माण होतात हें नमूद करणें अवश्य वाटतें.

वा. गं. देव

पुण्यस्मरण

भवोहि लोकाभ्युदयाय तादृशाम् ।

ता. ९ एप्रिल हा महाराष्ट्रीय ज्ञान कोशाचे विधाते, थोर समाजशास्त्री डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा श्राद्धदिन होय डॉक्टरांनी केलेल्या उज्ज्वल साहित्यसेवेचें स्मरण करून आम्हीं त्यांना आमची श्रद्धांजलि वाहतों.

संघवार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा शनिवार दि. २४-४-५४ रोजीं सायंकाळीं ६ वा. संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली.

१. प्रथम संघाध्यक्षांनी खालील दुखवटयाचे ठराव मांडले:—

ठराव १:—"श्रीमंत पूर्णचंद्रराव बुटी यांच्या आकस्मिक निधनाबद्दल वि. सा. संघाच्या कार्यकारिणीस अत्यंत खेद होत आहे संघाचे ते आश्रयदाते होते आणि वेळोवेळीं त्यांच्या कार्यास त्यांचें साहाय्य मिळत होतें. त्यांच्या निधनाने संघाचें अपरिमित नुकसान झालें आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !"

ठराव २:—"गोंदिया वि. सा. संघ शाखेचे पूर्वाध्यक्ष श्री. रामचंद्रराव वाईकर यांच्या निधनाने वि. सा. संघाच्या कार्यकारिणीस अत्यंत खेद होत आहे. नागपूरबाहेरील संघाच्या कार्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !"

ठराव ३:—"नागपूरचे लोकप्रिय पुढारी श्री. रामभाऊ रुईकर यांच्या मृत्यूने वि. सा. संघाच्या कार्यकारिणीस अतिशय दुःख होत आहे. संघाच्या कार्याबद्दल त्यांना आत्मीयता होती. राजभाषा अधिनियमाबाबत जें शिष्टमंडळ प्रांताच्या मुख्य मंत्र्यांना भेटलें होतें, त्यांत ते एक प्रमुख सदस्य होते. त्यांच्या मृत्यूने संघ त्या आत्मीयतेला मुकला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !'

एक मिनिट स्तब्ध राहून वरील तिन्ही दुखवटयाचे ठराव मंजूर झाले.

२. नंतर सरचिटणिसांनी दि. २१-३-५४ च्या का. का. मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

(अ) सरचिटणिसांनी 'युगवाणी'च्या संपादक मंडळाने श्री. पां. ब. गाडगीळ व श्री. ना. रा. शेंडे यांना संपादक मंडळावर घेतल्याचें सांगितलें.

(ब) शुद्धलेखन समितीचे आमंत्रक म्हणून डॉ. मा. गो. देशमुख यांना ठेवावें मी या समितीचा आमंत्रकाऐवजी सभासद म्हणून राहीन, असें डॉ. श्री. दा. पेंडसे यांनी सुचविलें. त्यांची सूचना मान्य होऊन डॉ मा. गो. देशमुख यांना विनंती करावी व अनुमति मागावी असें ठरलें. त्याचप्रमाणे संघाध्यक्ष श्री. ह ना. नेने हेहि या शुद्धलेखन समितीचे एक सभासद राहतील असें ठरलें.

३ नंतर १९५३-५४ सालचा जमा-खर्चाचा हिशेब व अधिकृत हिशेब-तपासनिसांचा ऑडिट रिपोर्ट सभेला सादर करण्यांत आला. त्याचप्रमाणे १९५३-५४ सालीं वि. सा. मंदिरावर झालेला खर्च व हिशेब-तपासनिसांचा ऑडिट रिपोर्ट सभेला सादर करण्यांत आला. हे सर्व हिशेब सभेने मंजूर केले.

४. त्यानंतर १९५४-५५ सालच्या अंदाजपत्रकावर पुनर्विचार करण्यांत आला. या अंदाज-पत्रकांत खर्चाच्या बाजूला ग्रंथसंपादनासाठी २००० रुपये दर्शविले आहेत. ही रक्कम भाषाविषयक संशोधन व ग्रंथसंपादन यासाठी दर्शवावी; तसेंच वर्गणीवाढीसाठी जमेच्या बाजूस दर्शविण्यांत आलेली २५०० रु.ची रक्कम पाठ्य-पुस्तक प्रकाशनाच्या रकमेंत जमेस धरावी, असें ठरलें.

श्री. वसंत बाळाजी शब्दे यांनी संघशाखांच्या कार्याच्या विकासासाठी केन्द्रीय कार्यालयाकडून कांही मदत मिळावी, अशी विनंती केली. त्याचा विचार होऊन, कार्यालयीन व्यवस्थेसाठी अंदाज-पत्रकांत नमूद केलेल्या रकमेंतून कार्यकारी मंडळाने संघशाखांना आवश्यक तें सहाय्य द्यावें असें ठरलें.

वरील तरतुदीसह १९५४-५५ सालच्या अंदाज-पत्रकास मान्यता देण्यांत येऊन, तें वार्षिक साधारण सभेपुढे मंजुरीस्तव ठेवावें असें ठरलें.

५. नंतर खालील उपसमित्या नियुक्त करण्यांत आल्या:--

संघशाखा घटना उपसमिति : आमंत्रक-श्री. वसंत बाळाजी शब्दे; सभासद-श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे आणि प्रा. मा. ल. व्यवहारे.

भाषाविषयक संशोधन समिति : अध्यक्ष-श्री. ह. ना. नेने; आमंत्रक-डॉ. शं. दा. पेंडसे; सभासद-डॉ. वि. भि. कोलते आणि डॉ. मा. गो. देशमुख.

६. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचें, कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा परत घेणें शक्य नसल्यासंबंधीचें, दि. २५-३-५४ चें पत्र सभेपुढे विचारार्थ ठेवण्यांत आलें. त्यावर चर्चा होऊन, निरुपायाने त्यांचा राजीनामा स्वीकृत करण्यांत आला.

७. संचालक, भाषा विभाग यांचेकडून आलेलें वार्षिक अनुदानासंबंधीचें दि. ५-४-५४ चें पत्र सभेला सादर करण्यांत आलें.

८. अचलपूर कँप (परतवाडा) येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे वि. सा. संघाच्या येत्या १७ व्या संमेलनाचें आलेलें निमंत्रण स्वीकारण्याचें ठरलें.

९. मराठी भाषा व वाङ्मयाचा इतिहास या योजनेंतील एका खंडाच्या खर्चाचा भार उचलण्याबाबत महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून आलेल्या दिं. २९-३-५४ च्या पत्राचा विचार करण्यांत येऊन, संघाच्या प्रस्तुत परिस्थितींत ही मदत करणें शक्य नसल्याची दिलगिरी व्यक्त करण्यांत आली.

१०. गडकरीस्मारक समितीचे कार्यवाह श्री. पां. वा. गडकरी यांचें कै. रा. ग. गडकरी यांच्या अर्ध पुतळ्यासंबंधीचें दि. १३-४-५४ चें पत्र सभेपुढे ठेवण्यांत आलें.

११. गोंदिया वि. सा. संघशाखेचे चिटणीस श्री. ना. ग. डबीर यांचें ट्रस्टडीडची नक्कल मागणारें दि. २१-३-५४ चें पत्र सभेच्या विचारार्थ ठेवण्यांत आलें. वि. सा. संघाचे विश्वस्त न्यायमूर्ति के. बु. मंगळमूर्ति यांच्या सल्ल्याने योग्य ती कार्यवाही करावी, असें ठरलें.

१२. खामगाव येथे स्थापन झालेल्या वि. सा. संघशाखेला मान्यता देण्यांत आली.

१३. वि. सा. संघाचे सभासद वाढविणाऱ्या प्रचारकांना सभासदत्वाची रक्कम पाठवितांना लागणारें म. ऑ. कमिशन कापून ती रक्कम पाठविण्यास मान्यता देण्यांत आली.

* *

वार्षिक साधारण सभा

वि. सा. संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २५-४-५४ रोजीं सकाळीं ८ वा. केंद्रीय कार्यालयांत भरली. निर्वाह संख्येच्या अभावीं तहकूब झालेली हीच सभा त्याच दिवशी त्याच जागीं सकाळीं ८-३० वा. संघाध्यक्ष श्री. द. ना. नेने यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

१. संघाध्यक्षांनी खालील दुखवटयाचे ठराव मांडले:—

ठराव १ : "श्रीमंत पूर्णचंद्रराव बुटी यांच्या आकस्मिक निधनाबद्दल वि. सा. संघाच्या वार्षिक साधारण सभेस अत्यंत खेद होत आहे. संघाचे ते आश्रयदाते होते आणि वेळोवेळीं त्यांच्या कार्याला त्यांचें सहाय्य मिळत होतें. त्यांच्या निधनाने संघाचें अपरिमित नुकसान झालें आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!"

ठराव २ : "गोंदिया वि. सा. संघ शाखेचे पूर्वाध्यक्ष श्री. रामचंद्रराव वाईकर यांच्या निधनाने वि. सा. संघाच्या वार्षिक साधारण सभेस अत्यंत खेद होत आहे. नागपूरबाहेरील संघाच्या कार्यांत त्यांचा फार मोठा वाटा होता. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!"

ठराव ३:—"नागपूरचे लोकप्रिय पुढारी श्री. रामभाऊ रुईकर यांच्या मृत्यूने वि. सा. संघाच्या वार्षिक साधारण सभेस अतिशय दुःख होत आहे. संघाच्या कार्याबद्दल त्यांना आत्मीयता होती. राजभाषा अधिनियमाबाबत जें शिष्टमंडळ प्रांताच्या मुख्य मंत्र्यांना भेटलें होतें, त्यांत ते एक प्रमुख सदस्य होते. त्यांच्या मृत्यूने संघ त्या आत्मीयतेला मुकला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!"

एक मिनिट स्तब्ध राहून वरील तिन्ही दुखवटयाचे ठराव मंजूर झाले.

२. सरचिटनिसांनी दि. २५-१२-५३ रोजीं खामगाव येथे भरलेल्या साधारण सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

३. नंतर, सरचिटणिसांनी १९५३-५४ सालचें कार्यवृत्त सभेला सादर केलें. या कार्यवृत्तांत 'सदस्यसंख्या' या स्तंभांतील फक्त सभासद वाढविण्याचे कामीं ज्यांनी श्रम घेतले त्यांचा उल्लेख असलेला भाग काढून टाकण्याचे बहुमताने ठरून, संपूर्ण कार्यवृत्त मंजूर झालें.

४. त्यानंतर सरचिटणिसांनी १९५३-५४ सालचा जमा-खर्चाचा हिशेब आणि अधिकृत हिशेब-तपासनिसांचा ऑडिट रिपोर्ट सभेला सादर केला. त्याचप्रमाणे १९५३-५४ सालीं विदर्भ साहित्य मंदिराबर झालेला खर्च व अधिकृत हिशेब-तपासनिसांचा ऑडिट रिपोर्ट सभेला सादर केला. यावर साधकबाधक चर्चा झाली. श्री. खं. के. रांगोळे यांनी, "गतवर्षीचे हिशेब सर्वसाधारण सभासदांना पाहतां यावे याकरिता हिशेबांची मंजुरी या सभेमध्ये न घेतां पुढील सभेमध्ये घ्यावी" असा ठराव मांडला. या ठरावाला श्री. ना. गो. ओगले यांनी दुजोरा दिला. या ठरावाला श्री. गोवर्धन अग्रवाल यांनी "पुढील सभा साधारणतः ऑगस्टपर्यंत घेण्यांत यावी व ठरलेल्या तारखेच्या अगोदर दहा दिवसपर्यंत सर्व हिशेब सभासदांना पहायला मिळावेत" अशी उपसूचना मांडली. श्री. खं. के. रांगोळे यांनी ही उपसूचना मान्य केल्यावर, थोडी साधकबाधक चर्चा होऊन अध्यक्षांनी उपसूचनेसह ठराव मताला टाकला व तो बहुमताने फेटाळला गेला. नंतर अध्यक्षांनी हिशेब सभेच्या मंजुरीस्तव ठेवले व ते बहुमताने मंजूर झाले.

५. नंतर, १९५४-५५ सालचें अंदाज-पत्रक सभेला सादर करण्यांत आलें. सरचिटणिसांनी जमा-खर्चाची खातेवार बाजू निवेदली. परीक्षा-समितीच्या खर्चाच्या बाबतींत परीक्षा-समितीचे संचालक प्रा. पां. कृ. मायळापूरकर यांनी समितीचें वाढतें कार्य लक्षांत घेतां अंदाज-पत्रकांत परीक्षा-

समितीसाठी नमूद केलेल्या रकमेंत हजार रुपयांची वाढ ऑगस्ट १९५४ पर्यंत २५०० रु. प्रवेश शुल्काच्या रूपाने जमा झाल्यास करावी, असें सूचित केलें. तेव्हा, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी ही सूचना योग्य असून याबाबत वाढ करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला देण्यांत यावा, अशी सूचना केली व ती सभेने एकमताने मंजूर केली. कार्यालयीन व्यवस्थेसाठी नमूद केलेली रक्कम 'कार्यालयीन व्यवस्था व शाखासहाय्य' यासाठी नमूद करावी असें ठरलें.

यानंतर १९५४–५५ सालचें अंदाज-पत्रक एकमताने मंजूर झालें.

६. नंतर, १९५४–५५ सालासाठी अधिकृत हिशेबतपासनिसांच्या नेमणुकीचा प्रश्न सभेपुढे आला. प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी गद्रे आणि कंपनीचे श्री. महेश्वर गद्रे यांचें नांव सुचविलें. श्री. श्रीकांत आगाशे यांनी अनुमोदन दिलें. दुसरें नांव पुढे न आल्याने श्री. महेश्वर गद्रे हे अधिकृत हिशेब-तपासनीस म्हणून एकमताने नेमण्यांत आल्याचें अध्यक्षांनी जाहीर केलें.

७ श्री. गं. सा. सहस्त्रबुद्धे यांनी 'ही सभा गेल्या कार्यकारिणीचे आभार मानते' असा ठराव मांडला व त्यास श्री. माणिक के. वैतुले यांनी दुजोरा दिला. ठराव एकमताने सम्मत झाला.

सरचिटणिसांनी सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सभेचे आभार मानल्यावर ही वार्षिक साधारण सभा संपली.

* *

श्री. अशोक मेहता यांची भेट व भाषण

प्रजा-समाजवादी पक्षाचे एक प्रमुख नेते श्री. अशोक मेहता यांनी रविवार दि. ४–४–१९५४ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं 'स्वातंत्र्य व साहित्य' या विषयावर त्यांचें विचार-परिप्लुत भाषण झालें.

* *

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट

प्रसुसिद्ध पुढारी व कायदेपंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी डॉ. सौ. माईसाहेब आंबेडकर यांच्यासमवेत दि. २–५–५४ रोजीं वि. सा. संघाला भेट देऊन, कार्यकर्त्यांशी विविध विषयांवर मोठी उद्बोधक चर्चा केली.

* *

श्री. जगजीवनराम यांची भेट

केन्द्रीय सरकारचे तार, पोस्ट आणि दळणवळण मंत्री श्री. जगजीवनराम यांनी दि. ६–५–१९५४ रोजीं वि. सा. संघाला भेट देऊन आपले साहित्यविषयक विचार प्रगट केले.

* *

मंदिर-निधीस देणग्या : चुकीची दुरुस्ती

'युगवाणी'च्या एप्रिल ५४ च्या अंकांत देणगीदारांची जी यादी प्रसिद्ध झाली आहे त्यांत, श्री. यशवंत कुळकर्णी ऐवजीं श्री. यशवंत कर्णिक; सौ. इंदुमतीबाई केळकर ऐवजीं प्रा. श्रीमती इंदुमतीबाई केळकर; सौ. सुमित्राबाई कुळकर्णी ऐवजीं सौ. सीमंतीनी कुळकर्णी आणि डॉ. हिरालाल जैन यांच्या नांवापुढे असलेल्या ५ रुपयांऐवजीं ३५ रुपये असें वाचावें.

* *

गोंदिया -शाखा--वृत्त

वि. सा. संघ गोंदिया शाखेची सर्वसाधारण सभा ता. २८-३-५४ ला शाखाध्यक्ष श्रीमान् छोटुसाभाई यांचे अध्यक्षतेखाली भरून १९५४-५५ या नवीन वर्षाकरिता श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रीय यांनाच शाखेचे अध्यक्ष एकमताने निवडण्यांत आलें व त्यांना कार्यकारिणीवर सभासद नियुक्त करण्याचा अधिकार देण्यांत आला. वार्षिक हिशेब मंजूर करण्यांत येऊन, इमारत फंडाकरिता निधि जमविण्यास सुरवात करावी असें ठरलें.

वरील सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे अध्यक्षांनी कार्यकारिणीवर सभासद नियुक्त केले व त्यांची ता. १०-४-५४ रोजीं सभा होऊन नवीन वर्षाकरिता खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यांत आली. त्याचवेळीं जुन्या कार्यकारिणीची व नवीन कार्यकारिणीची संयुक्त सभा भरून नवीन कार्यकारिणीला अधिकार प्रदान करण्यांत आले.

नवीन वर्षाकरिता निवडलेलें कार्यकारी मंडळ

श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रीय- अध्यक्ष.
,, के. खं. कुळकर्णी-उपाध्यक्ष
श्री. ना. ग. डबीर - कार्यवाह
श्री. ल. मा. टेंभेकर, श्री. आनंद देशपांडे } सहकार्यवाह
श्री. ल. गो. पाठक - खजीनदार
श्री. बा. का. देशमुख - परीक्षाकेन्द्राधिकारी,

सर्वश्री. रा. रा. डोये, व्यवहारे, लिमये, इंगळे, काटे, तेलंग, शब्दे, घुसे, मार्डीकर, जोशी, स. गो. बापट, अलोणी, महादेवराव घोटे हे कार्यकारिणीवर सभासद निवडले आहेत.

इमारतनिधीस देणग्या

विदर्भ साहित्य संघ, गोंदिया शाखेतर्फे बांधण्यांत येणाऱ्या विदर्भ साहित्यमंदिराकरिता ता. १०-४-५४ ला. खालीलप्रमाणे कार्यकारी मंडळाच्या सभासदांकडून देणग्या मिळाल्या.

१००१	श्रीमान्	छोटुसाभाई क्षत्रीय.	१०१	श्रीमन्	ल. गो. पाठक
१५१	,,	के. खं. कुळकर्णी	५१	,,	नं. बां. पाळेकर
१५१	,,	पु. रा. जोशी	२१	,,	वि. गो. सरूरकर
१५१	,,	ग. गो. व्यवहारे	११	,,	प्र. त्र्यं. घुसे
१५१	,,	ना. ग. डबीर	१०		आनंद देशपांडे
१०१	,,	ना. इ. तेलंग	१०	,,	व. बा. शब्दे.
१०१	,,	बा. का. देशमुख			

विदर्भ मंदिराकरिता श्रीमान् बापट बंधूंची उदार देणगी

वरील मंदिराकरिता श्रीमान् बापुसाहेब बापट श्री. सदाशिवराव बापट व त्यांचे बंधु यांनी विनामूल्य जमीन दिली आहे.

वरील देणग्या व जमिनीच्या देणगीबद्दल विदर्भ साहित्य संघ, गोंदिया शाखा आभारी आहे.

ना. ग. डबीर
चिटणीस-विदर्भ साहित्य संघ, गोंदिया शाखा.



सौ. सगुणाबाई देशमुख
आणि
श्री. दा. वि. देशमुख, वाळोणेकर
'गृहशान्ती'चा धार्मिक विधि
करीत असतां--



राष्ट्रपतींनी तोरण तोडल्यानंतर
त्यांच्या शेजारीं मंदिररचना समितीचे
चिटणीस श्री नाना जोग
चांदीचें तबक घेऊन उभे आहेत.

अनुक्रमणिका

राष्ट्रपतींच्या हस्तें विदर्भ साहित्य मंदिराचें उद्घाटन

मंगळवार दि. २७ एप्रिल १९५४ रोजीं सकाळीं बरोबर ६। वाजतां विदर्भ साहित्य मंदिराच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. या समारंभासाठी मंदिराची भव्य इमारत आणि त्याचें प्रशस्त पटांगण उत्कृष्ट रीतीने शृंगारलेलें होतें. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ कुंकुमांकित मंगलघट दोन्ही बाजूंना ठेवलेले होते; व प्रवेशद्वारापासून अंतर्भागापर्यंत दोन्ही बाजूंनी सुंदर रांगोळी काढलेली होती. पहाटे ५ वाजल्यापासून श्री. धोंडीबुवा गायकवाड यांच्या मंजुळ सनईसह चौघड्याचे निनाद वातावरणांत दुमदुमत होते. मंदिराच्या पिछाडीला पश्चिमाभिमुख सुंदर शामियाना घातलेला होता. सकाळीं ६ च्या सुमारालाच हा शामियाना नागपुरांतील सर्व श्रेणींच्या प्रमुख स्त्रीपुरुषांनी चिक्कार भरून गेला होता; व मंडपाबाहेरहि पटांगणांत अनेक लोक उभे होते.

स्वागत आणि परिचय


राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद हे बरोबर ६। वाजतां राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या आणि मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्यासह मंदिराच्या पूर्वेकडील केळींचे खांब आणि अशोक–आम्र–पल्लवांच्या तोरणांनी शृंगारलेल्या प्रवेशद्वारांतून आंत आले. त्याबरोबर स्टेट हेडक्वार्टर्स गर्ल्स गाईडच्या पथकाने 'जनगणमन' हें राष्ट्रगीत सुस्वर वाजविलें. विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारी विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांनी राष्ट्रपतींचें स्वागत केलें; व डाव्या बाजूला उभे असलेले वि. सा. संघाचे अध्यक्ष, श्री. ह. ना. नेने, पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. भ. श्री. पंडित आणि चालू कार्यकारिणीचे उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे, चिटणीस श्री. ल. वि. पांढरीपांडे, श्री. वसंत बाळाजी शब्दे, श्री. तु. ना. काटकर व सदस्य प्रा. पां. कृ. सावळापुरकर, श्री. पां. बा. गडकरी, श्री. केशव केळकर, श्री. रा. पु. सगदेव, श्री. त्र्यं. द. देशमुख पारवेकर, श्री. य. शं. धर्माधिकारी आणि गडकरी–स्मारक समितीच्या कार्याध्यक्ष कु. ताराबाई प्रधान व मंदिर-रचना समितीचे कार्यवाह श्री. नानासाहेब जोग यांच्याशीं त्यांचा परिचय करून दिला.

तोरण कापून मंदिराचें उद्घाटन केलें

नंतर राष्ट्रपति मंदिराच्या पायऱ्या चढून वर आले; व मंदिर समितीचे कार्यवाह श्री. नानासाहेब जोग यांनी दिलेल्या चांदीच्या कात्रीने महाद्वाराला लावलेलें केशरी सूत्रांतील तोरण कापून त्यांनी मंदिराचें उद्घाटन केलें. आंत आल्यावर न्या. मू. मंगळमूर्ति आणि अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांनी त्यांना आंतील निरनिराळ्या व्यक्तींच्या नांवाने बांधलेलीं दालनें दाखवून व्यासपीठावर नेलें. तेव्हा सर्व उपस्थित स्त्री–पुरुषांनी त्यांना उत्थापन दिलें. समारंभाच्या या सर्व भागाची माहिती ध्वनिवर्धकावरून उपस्थितांना देण्याची खास व्यवस्था नागपूर आकाशवाणीच्या साह्याने करण्यांत आली होती. व्यासपीठावर त्यांच्या डाव्या हाताला राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या आणि मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल व उजव्या हाताला संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने आणि द्वारकाप्रसाद मिश्र हे बसलेले होते. राष्ट्रपति स्थानापन्न झाल्याबरोबर श्री. नेने यांनी त्यांना हार घातला; व सरचिटणीस श्री. ना. रा.



वि. सा. संघाचे विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति
राष्ट्रपतींना संघासंबंधीं माहिती देत आहेत.



राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद वि. सा. संघाला आशीर्वाद देत असतां—

अनुक्रमणिका

शेंडे यांनी राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या व मुख्य मंत्री पं. शुक्ल आणि माजी गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांना हार घातला.

यानंतर संघाध्यक्ष श्री. नेने यांनी आपलें भाषण वाचून दाखविलें.

संघाध्यक्ष श्री. नेने यांचें भाषण

"विदर्भ साहित्यमंदिराच्या उद्घाटन-समारंभासाठीं जमलेल्या आपणा सर्वांचें मी मोठ्या आनंदाने स्वागत करतों. आजचा दिवस परममंगल व पवित्र आहे. राष्ट्रपतींच्या वरद-हस्ताने इमारतीचें नुकतेंच उद्घाटन झालें आहे. विदर्भ साहित्य संघाच्या एकतीस वर्षांच्या इतिहासांत इतका अपूर्व व स्मरणीय दिवस आजचाच. आजच्या मंगलदिनानें 'मंगलवार' हें नांव सार्थ केलें आहे. या समारंभास भारताचे साधुतुल्य राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद लाभले, हें आपलें थोर भाग्य होय. शरीरप्रकृति अस्वस्थ असतांनाहि त्यांनी आमच्या निमंत्रणाचा मोठ्या सौजन्याने स्वीकार केला म्हणून आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोंत. त्यांनी येथे येऊन उद्घाटन केलें, याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

विदर्भ साहित्य संघाचे कार्यक्रम

विदर्भ साहित्य संघाची स्थापना संस्थेचे पहिले सरचिटणीस प्रा. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या परिश्रमाने अमरावती येथे १९२३ सालीं झाली. त्यावेळीं मंजूर करण्यांत आलेल्या घटनेच्या पहिल्या कलमान्वयें 'वऱ्हाड, खानदेश, मराठी मध्यप्रांत व निजाम राज्यांतील मराठवाडा' अशी 'विदर्भ' शब्दाची व्याप्ति ठरली; आणि दुसऱ्या कलमान्वयें संघाच्या कक्षेंत असलेल्या या प्रदेशांतील प्राचीन व अर्वाचीन मराठी भाषा व मराठी वाङ्मय यांची अभिवृद्धि व प्रसार करणें असा संघाचा उद्देश आहे. मराठी भाषा व मराठी साहित्य यांच्या सर्व शाखांचें संशोधन, संरक्षण व संवर्धन करणें, ग्रंथप्रकाशन, वाङ्मयीन चर्चा आणि विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम करणें, वार्षिक संमेलनें भरवणें, सुप्रसिद्ध वक्त्यांचीं भाषणें करविणें, मराठीच्या प्रसारासाठी निरनिराळ्या परीक्षांची संयोजना करणें, 'युगवाणी' सारखें वाङ्मयीन मासिक चालविणें, इत्यादि गोष्टी विदर्भ साहित्य संघाच्या आतापर्यंतच्या कार्यक्रमांत अंतर्भूत झालेल्या आढळतील.

मंदिराच्या उभारणीचा वृत्तांत

सन १९५० सालीं मध्यप्रदेश सरकारच्या सहानुभूतीने एक एकराहून अधिक जागेचें भूमिदान मिळालें. मग तज्ज्ञांच्या सल्ल्याने विदर्भ साहित्यमंदिराची पूर्ण योजना आखण्यांत येऊन १९५१ सालीं रामनवमीच्या शुभदिनीं मंदिराचा कोनशिलान्यास सुप्रसिद्ध 'कृष्णायन' महाकाव्याचे निर्माते व त्या वेळचे गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या हस्तें झाला. सन १९५२ सालीं बलिप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर पायाखोदणीचा समारंभ मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री पं. रविशंकरजी शुक्ल यांच्या हस्तें झाला; व आज आपल्या डोळ्यांसमोर मंदिराची ही इमारत उभी आहे. यापुढे रंगमंदिराची उभारणी झाली म्हणजे मंदिराची कल्पना पूर्णपणें साकारतेला आली असें होईल.

सांस्कृतिक विकासाचें केंद्र

प्रस्तुतच्या इमारतीमुळे संशोधन, प्रकाशन, वाङ्मयीन चर्चा, संमेलनें, सभा इत्यादि गोष्टींना भरपूर वाव मिळून मायबोलीच्या द्वारें ज्ञानप्रसाराचीं नवीन साधनें उपलब्ध होऊन भारतीय संस्कृतीच्या


प्रसाराचें हें मंदिर एक महत्त्वाचें स्थान होईल. सध्याच्या इमारतीच्या जोडीला रंगमंदिराची इमारत पुढे तयार झाली म्हणजे मराठीप्रमाणेच इतर भाषाभाषी जनतेला नाट्याभिवृद्धीसाठी तिचा उपयोग करतां येऊन भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांच्या विकासाला साधनभूत असें हें केंद्र निर्माण होईल.

मराठी साहित्याची परंपरा

सर्वांभूतीं समत्व पाहण्याची, आपल्या राष्ट्रांतील भिन्न भिन्न घटकांविषयींच केवळ नव्हे, तर संपूर्ण मानवजातीविषयीं सहानुभूति बाळगण्याची मराठी संत-साहित्याची परंपरा आहे. आपले आजचे अध्यक्ष वृत्तीने त्याच परंपरेंतील आहेत. राष्ट्रभाषेबरोबरच लोकभाषांच्या विकासाची त्यांना निस्सीम कळकळ आहे. आजच्या प्रसंगीं येऊन मंदिराचें उद्‌घाटन केल्याबद्दल पुनः एकवार त्यांचे आभार मानतों; व प्रसंगाला उद्देशून दोन शब्द बोलून त्यांनी शुभाशीर्वाद द्यावा, अशी मी त्यांना सादर विनंती करतों."

यानंतर राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें भाषण झालें.

राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचें भाषण



राज्यपाल महोदय, मुख्यमंत्री, बहनों और भाइयों,

आजके समारोहमें शरीक होना मेरे लिए बडी प्रसन्नता की बात है। जब पहले मुझसे कहा गया था तो मैंने, जैसा कि आपने कहा इस खयालसे कि शायद देर लगेगी और मैं दिल्ली ठीक समयसे नहीं पहुँच सकूंगा, मैंने इनकार किया, मगर जब मैं यहाँ आया, और मुझे सब बातें बताई गई कि सबेरे भी यह काम हो सकता है तो, मैंने सहर्ष स्वीकार कर लिया। विशेषकर इससे कि मैं देखता हूँ कि जहाँ जहाँ मैं जाता हूँ कि प्रत्येक प्रांत के लोग अपनी अपनी भाषाकी उन्नति, साहित्य की उन्नति और संस्कृतिकी चीजें हैं उनकी उन्नति सब चाहते हैं। क्योंकि भारतवर्ष इतना बडा देश है और इसमें इतने प्रकारके लोग बसते हैं, इतनी भाषाएँ बोली जातीं हैं और रहन-सहनमें भी कुछ जहाँ-तहाँ बहुत करके अंतर भी है। तो इन सबोंको मिलाकरके ही जो सुंदर चित्र बनता है वही भारतवर्ष है, इनमेंसे कोई कमजोर हो जाय, कोई भी पीछे रह जाय या किसीमें किस किस्म का ऐब आ जाय तो सारे चित्रमें ऐब आ जाता है और सारा भारतवर्ष बिगड जाता है। इसलिए हमारी चेष्टा यह होनी चाहिये कि भारतवर्ष के जितने अंग हैं, प्रत्येक अंग पुष्ट किया जाय, प्रत्येक को ऐसा बनाया जाय कि वह अपना काम करते हुए सारे भारत का काम खूबी के साथ कर सके। इसलिये हमारे पूर्वजोंने इतनी विभिन्नता होते हुए भी इसे एक माना। विदेशी भी हर तरह की विभिन्नता होते हुए भी भारतकी एकता को समझ जाता है। और भारतीय के हृदयमें तो एकता की भावना रहती ही है। तो हम तो यह चाहते हैं कि जो भाषाएँ भारतमें बोली जाती हैं वे सब अपने अपने स्थानपर उन्नत हों। और यद्यपि हमने संविधा-

नमें हिंदी को सार्वदेशिक कामों के लिए राष्ट्रभाषा मान लिया तो उसका अपना स्थान है। मगर उसके साथ सभी भारतीय भाषाओंका अपना अपना स्थान है। और सबका उन्नत होना, अपने स्थानमें काम करना जरूरी है।

भारतीय सांस्कृतिका केंद्र: नागपुर

नागपुर का अपना एक बहुत बड़ा स्थान है कि वह ठीक भारतके केंद्रमें पडता है। उत्तर जहां हिंदी की प्रधानता है उससे मिला जुला है। पश्चिम महाराष्ट्र है। तो महाराष्ट्र तो है ही, महाराष्ट्रके अंदर ही है। मराठी है ही है यहां। और दक्षिण जहां दाक्षिणात्य आरंभ होता है तो वह भी यही से आरंभ होता है। एक तरफ तेलुगू, दूसरी तरफ हिंदी, कुछ हिस्सेतक बंगाल के पासतक चला जाता है तो उसमें कोई आश्चर्य की बात नहीं। ऐसे एक केंद्रको सब तरफसे उन्नत होना आवश्यक है। और यहां हवाई जहाज का जो अड्डा बन गया जहां चारों तरफसे हवाई जहाज आते हैं। बंबई से कलकत्ते चलो तब यहां, कलकत्ते से बंबई-मद्राससे दिल्ली चलो या दिल्ली से मद्रास-हर हालतमें हवाई जहाजसे या रेलसे-यहां हमें उतरनाही पड़ता है। ठहरनाही पडता है, गुजरना ही पडता है। यह कृत्रिम नहीं है, स्वाभाविक है। इस केंद्र का यह स्थूल रूपसे जो महत्व है वैसेही सांस्कृतिक इतिहासमें भी, भाषा के इतिहासमें भी, नागपुर का वही एक केंद्र का स्थान है। यहांपर जो कुछ है उसे उन्नत होना चाहिये।

इस बातसे मैं बहुत संतोष मानता हूं कि आपकी यह संस्था २०-२१ वर्षोंसे जैसे आपने कहा, संशोधनका, प्रकाशनका, हर तरहसे साहित्यकी उन्नतिका काम करती आ रही है। और आगे भी अब जब इसको एक भवन मिल गया और बन गया तो और भी इस का काम तेजीसे बढेगा। ऐसी मुझे आशा है और मेरी अभिलाषा है। मैं आप सबको बहुत धन्यवाद देता हूं कि आपने मुझे मौका दिया कि आपसे मैं मिल सका। और इस समारोहमें थोडी देरके लिए भी शरीक हो सका। और फिर जब कभी इधर आनेका मौका होगा आपकी उन्नति की रिपोर्ट आप मुझे बतायेंगे। और कहेंगे कि जिस भवनका आज उद्घाटन हो रहा है, उसमें आप जो पुस्तकालय बनाने जा रहे हैं, संग्रहालय बनाने जा रहे हैं, जो संशोधनका काम करनेका निश्चय किया है वह तेजी के साथ आगे बढ रहा है।

मंदिराचें समर्पण

नंतर मंदिरसमितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग म्हणाले, "गेल्या तीन वर्षांत असंख्य व्यक्तींचें सढळ आर्थिक सहाय्य, निढळाचा घाम काढणारे परिश्रम, हार्दिक सल्ला आणि सदिच्छा हीं हें मंदिर आजच्या आकाराला येण्यास कारण झालीं आहेत. विटेवर वीट रचली जात असतांना ह्या महान् घटनेचा पाहणी मी करीत होतो. आज ह्या मंदिराचा एक तृतीयांश भाग माझ्या हातावेगळा होत आहे. आजच्या आणि उद्याच्या साहित्यकारांच्या हातीं तो आता पडत आहे. संकल्पाचें उदक सोडतांना आपल्या राष्ट्रपतींसारख्या थोर पुरोहितांनी मंत्रोच्चार केला आहे. अशा ह्या भाग्याच्या प्रसंगीं झालेली माझी मनःस्थिति सुबुद्ध साहित्यकारांना निस्संशय कळूं शकेल. शब्दापुढे शब्द रचून पूर्ण झालेला ग्रंथ हातावेगळा होत असतांनाची ही मनःस्थिति आहे. ह्या मंदिराचे ठिकाणीं यापुढे पावित्र्याची स्थापना करणें आणि त्याचें रक्षण करणें मी त्यांच्यावरच सोपवितों."

आजच्या दात्यांचे आभार; उद्यांच्या दात्यांना आवाहन

नंतर कोषाध्यक्ष सौ. प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे या दात्यांचे आभार मानतांना म्हणाल्या, "स्वतंत्र भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्तें विदर्भ साहित्य मंदिराचें उद्घाटन होण्याचा हा दिवस अत्यंत

अनुक्रमणिका

मंगल आहे. ही इमारत पुरी होऊन हा मंगल दिवस ज्यांच्या दातृत्वामुळे आज विदर्भ साहित्यसंघाला दिसत आहे, त्या अनेक लहानथोर दात्यांचें मनःपूर्वक आभार मानणें आमचें आद्य कर्तव्य आहे. त्या सर्व दात्यांना विदर्भ साहित्य संघाच्या कार्याविषयी आपुलकी वाटते. कारण त्यांना मातृभाषेविषयी कळकळ आहे; आणि या प्रदेशाच्या सांस्कृतिक विकासाविषयी त्यांना आस्था वाटते. या कार्यासाठी सहाय्याच्या अपेक्षेने आम्ही त्यांच्याकडे जातांच त्यांनी आपापल्या परीने लहान मोठ्या देणग्यांच्या रकमा अत्यंत आत्मीयतेने आमच्या स्वाधीन केल्या; व त्यांच्या बळावर हें मंदिर उभारलें गेलें. हें मंदिर त्यांचें आहे. आज राष्ट्रपतींच्या हस्तें तें त्यांना आणि सर्व साहित्यप्रेमी जनतेला अर्पण करण्यांत येत आहे. त्यांनी येथे यावें, साहित्याचा आस्वाद घेत जावा आणि त्या आस्वादाने प्रसन्न होऊन आमच्या पुढच्या कार्याला वाढत्या आपुलकीने मदत करावी; ही विनंती आहे. विदर्भ साहित्य संघासमोर रंगमंदिराची विस्तृत योजना आहे. ती योजना अधिक उदार दातृत्वाला आवाहन करील, असा विदर्भ साहित्य संघाला पूर्ण विश्वास वाटतो. आजपर्यंतच्या सर्व लहानथोर दात्यांचे मी संघातर्फे फिरून मनःपूर्वक आभार मानतें आणि उद्याच्या दात्यांनी या संस्थेकडे आपली पूर्ण कृपादृष्टि वळवावी अशी त्यांना प्रार्थना करतें."

राष्ट्रपतींचे आभार

शेवटीं वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे यांनी लोकनायक डॉ. बापूजी अणे, भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख, श्री. बाबासाहेब आणि प्रो. अण्णासाहेब खापर्डे व प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या शुभसंदेशांचा उल्लेख करून सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, "आजच्या या मंगल समप्रहरीं आपण सर्व इतक्या अगत्याने येथे आलांत, याचा विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांना केवढा अभिमान व आनंद वाटतो, हें शब्दांनी व्यक्त करतां येत नाही. अनेक अडचणींमुळें आपणा सर्वांना या समारंभाची जेवढी अगाऊ सूचना देणें उचित होतें, तितकी देतां आली नाही. परंतु आपण सर्व जण आपल्या या साहित्यसंस्थेवर नितांत लोभ ठेवून आलांत व कांहीशी गैरसोय सहन करून आपण आपला जिव्हाळा व्यक्त केलात, यावद्दल आपले जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. आपल्या स्वागतामध्ये अनेक उणीवा राहिल्या असतील; पण हें स्वागत मनःपूर्वक केलेलें आहे हें जाणून आपण आमच्या प्रमादाबद्दल क्षमा कराल, अशी आशा बाळगतों. पूज्य राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद यांनी विदर्भ साहित्यमंदिराचें उद्घाटन करून त्याला पुनीत केलें आहे. त्यांच्या पवित्र चरणांच्या स्पर्शाने हें साहित्यमंदिर शुचिर्भूत झालें आहे. ही अविस्मरणीय घटना विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी कोरली जाईल. मी वंदनीय राष्ट्रपति, मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या, मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल; आणि पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचे, या समारंभाला आपण उपस्थित राहून अपूर्वता आणली यास्तव आपले आणि ज्यांनी सहृदयतेने हा समारंभ यशस्वी करण्यास मदत केली त्या सर्वांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार मानतों."

शेवटीं सौ. कुसुमताई मोहनी यांनी आपल्या खड्या सुरेल आवाजांत 'वंदेमातरम्' म्हटल्यानंतर हा वैशिष्ट्यपूर्ण समारंभ समाप्त झाला.

राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपलें स्वतःचें सुंदर छायाचित्र आजच्या उद्घाटनाच्या मंगल समारंभाचें संस्मरण म्हणून विदर्भ साहित्य संघाला भेट दिलें. त्यावर राष्ट्रपतींनीं आपली स्वाक्षरी हिंदींत आणि इंग्रजींत केलेली आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य मंदिराचें उद्घाटन : जाहीर आभार

मंगळवार दि. २७ एप्रिल १९५४ रोजीं पहाटें ६। वाजतां राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें विदर्भ साहित्य मंदिराचें उद्घाटन नीटनेटक्या समारंभांत यशस्वी रीतीने पार पडलें हें आता सर्वश्रुत आहे. ज्या अनेक व्यक्तींच्या व संस्थांच्या सहाय्यामुळे हें यश आमच्या पदरीं पडलें त्या सर्वांचे जाहीर आभार मानणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

राष्ट्रपतींच्या हस्तें हें उद्घाटन होण्याचें जेव्हा ठरलें त्यावेळीं ह्या समारंभाची तयारी करण्यास पुरेसा अवधि होता, व त्या धोरणाने आम्ही यथावकाश तयारीला लागलों. परंतु मध्यंतरीं हा कार्यक्रम राष्ट्रपतींच्या अस्वास्थ्यामुळे रद्द झाला, आणि आमचें तयारीचें काम आम्हाला बंद करावें लागलें. नंतर हा कार्यक्रम ज्या दिवशीं पुन्हा ठरला त्यानंतर आमच्यापुढे फक्त दोनच दिवसांचा अवधि उरला होता. एवढ्या अल्पावधींत हा कार्यक्रम नीटपणें कसा पार पडणार अशी आम्हा सर्वांनाच काळजी पडली. ही काळजी अनेक सुहृदांनी व संस्थांनी पुढे होऊन दूर केली एवढेंच नव्हे तर हा कार्यक्रम अपेक्षेबाहेर यशस्वी करून दाखवला. त्यांनी केलेल्या ह्या सहाय्याचा तपशील हृद्य आणि मनोरंजक असल्यामुळे आम्ही तो थोड्या विस्ताराने देत आहों.

नागपुरांतील अनेक चित्रपटगृहांचे मालक आणि एक लोकप्रिय नागरिक रावबहादुर रंगाराव नायडू आणि त्यांचे बंधु श्री. चक्रपाणी नायडू ह्यांच्याच कर्तृत्वामुळे मंदिराच्या सभोंवतालची सजावट अरेबियन नाइट्स्मधील एखाद्या चमत्काराप्रमाणे पाहातांपाहातां एका रात्रींत साधली गेली.

एम्प्रेस मिल्सचा भव्य शामियाना संपूर्ण सजावटीसह, त्यांना सूचना मिळाल्यापासून अवघ्या २४ तासांत उभा झाला, ह्याचें श्रेय मिलच्या चालकांना तर आहेच, परंतु ह्या कामाची देखरेख करणारे श्री. लालखां व त्यांचे सहकारी ह्यांना त्या अद्भुत घटनेच्या श्रेयाचा मोठा वाटा द्यावा लागेल.

ह्याच थोड्या अवधींत नागपूर युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु श्री. कुंजीलाल दुबे व रजिस्ट्रार श्री. उमावर मिश्र ह्यांना केवळ टेलिफोनवर विनंती करतांच त्यांनी तत्परतेने व विनामूल्य हव्या तेवढ्या खुर्च्या आमच्या स्वाधीन केल्या आणि एका मोठ्या अडचणींतून आम्हाला मुक्त केलें. येथील हिस्लॉप सिटी कॉलेज व मोहोता सायन्स कॉलेजचे प्राचार्य श्री. पांढरीपांडे यांच्या सौजन्याने ह्या शिक्षणसंस्थांतील एकूण एक खुर्च्या आम्हांला उपलब्ध झाल्या. त्या नेण्याआणण्यासाठी येथील काचकारखान्याचे चालक श्री. दिगंबरपंत ओगले आणि मॉडेल मिलचे मॅनेजर श्री. साम्राज्यम् नायडू ह्यांनी आपले मोटार ट्रक विनामूल्य आमच्या दिमतीस हजर केले.

इंप्रुव्हमेंट ट्रस्टचे चेअरमन श्री. बेव्हार आणि सिव्हिल इंजिनिअर श्री. घाणेकर ह्यांच्यापुढे आमची अडचण मांडतांच त्यांनीहि मोठ्या हौशीने उत्तरेकडील नाल्यावर पूल बांधण्यास मदत केली व सडक दाबण्याचा रोलर उपलब्ध करून दिला. इंडियन जिमखान्याकडून ऐन वेळेवर त्यांचा हलक्या-वजनाचा रोलर आम्हाला मिळाला.

मंदिराची प्रवेशिका व अंतर्भाग सजविण्यांत श्री. एस्. के. कुंडु, प्रो. गुहा, कुमारी रेवा घोस आणि त्यांच्या सहकारी भगिनी ह्यांनी आदल्या रात्रीं जागून आपल्या कुशल हातांनी रांगोळ्यांची वेलबुट्टी काढली आणि प्रसंगाच्या रमणीयतेंत मोलाची भर टाकली.

ही सर्व तयारी झाल्यानंतर, त्या प्रसंगास शोभतील अशा चार खुर्च्या व्यासपीठावर मांडणें अवश्य होतें. त्यासाठी आम्ही प्रा. के. एम्. उर्फ भैयाजी वैद्य यांची पहाटे ३ वाजतां झोपमोड केली व त्यांच्या बैठकींतून त्यांच्या खुर्च्या उचलून आणल्या.

एवढा सारा आटापिटा करून झालेल्या तयारीची फलश्रुति त्या पहाटेस शेंकडो स्त्रीपुरुषांची त्याप्रसंगीं झालेली उल्हसित उपस्थितिच म्हणावी लागेल. त्यांच्या वक्तशीर आगमनामुळेच साऱ्या श्रमांचें चीज झालें.

जसजशी गर्दी लोटूं लागली तसतशी मोटारींची संख्याहि वाढूं लागली. त्यांची व्यवस्था शेजारच्या हिंदी साहित्य संमेलनाच्या आवारांत करणें संमेलनाच्या सौजन्यामुळेच सुलभ झालें.

मंदिराच्या आवारांत राष्ट्रपतींचा प्रवेश होतांच त्यांचें सुस्वर ' जनगणमना'ने स्वागत करण्याचे कामीं स्थानिक गर्ल्स् गाइड्स् व त्यांच्या चालिका सौ. कुसुमताई वानखेडे ह्यांचें हार्दिक सहकार्य आम्हाला लाभलें.

अखिल भारतीय नभोवाणीच्या स्थानिक चालकांनी ह्या प्रसंगाचें धावतें वर्णन आणि ध्वनिमुद्रिकेच्याद्वारें सविस्तर ध्वनिक्षेपण करण्याचें कार्य अंगावर घेतलें.

सरतेशेवटीं येथील सुप्रसिद्ध गायिका सौ. कुसुमताई मोहोनी ह्यांनी आपल्या सुरेल आवाजांत ' वंदेमातरम् ' म्हणून ह्या समारंभाचा शेवट गोड केला.

आणीबाणीच्या प्रसंगीं ह्या सर्वांनी सहानुभूतिपूर्वक पुढाकार घेऊन विदर्भ साहित्य मंदिराच्या उद्घाटनाचें हें कार्य यशस्वी करण्यास आपुलकीने हातभार लावला नसता तर काय झालें असतें ह्याची कल्पनाच करवत नाही. वि. सा. संघाचें भाग्यच थोर असें आम्ही समजतों व ह्या भाग्याचा आमच्यावर वर्षाव करणाऱ्या, वर निर्दिष्ट केलेल्या सर्व व्यक्तींचे व संस्थांचे आणि संघाच्या सर्व कार्यकर्त्यांचे आम्ही अंतःकरणपूर्वक जाहीर आभार मानतों. कांही व्यक्तींनी दिलेल्या सहकार्याचें ऋण अनामिक राहावें अशी त्यांची इच्छा असल्यामुळे आमचा नाइलाज आहे.

वि. सा. मंदिराची वास्तु-शांति

आणखी एक महत्त्वपूर्ण घटना ह्यापूर्वी घडली. तिचाहि साभार उल्लेख करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों. वि. सा. मंदिराचें सार्वजनिक उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्तें होण्यापूर्वी ह्या मंदिराची धार्मिक विधिपूर्वक गृहशांति होणें आवश्यक आहे अशी, ह्या मंदिराच्या बांधकामासाठी स्वयंस्फूर्त पहिली व सर्वांत मोठी देणगी देणाऱ्या सौ. सगुणाबाई देशमुख वाढोणेकर ह्यांनी इच्छा प्रदर्शित केली. एवढेंच नव्हे तर त्या विधीसाठी लागणारा जवळजवळ पाऊणशें रुपयांचा खर्चहि त्यांनी सोसला. हा विधि त्यांनी त्यांचे पति श्री. दामूअण्णा देशमुख ह्यांच्या समवेत गेल्या रामनवमीच्या सुमुहूर्तावर हौशीने साजरा केला. ह्या त्यांच्या कळकळीबद्दल आम्ही उभयतांचे अत्यंत आभारी आहोंत.

के. तु. मंगळमूर्ति
विश्वस्त, वि. सा. संघ

ह. ना. नेने
अध्यक्ष, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्

संचालनालय, भाषा विभाग, रामदासपेठ, नागपूर

सूचना

हिंदी व मराठी लेखकांना त्यांच्या मौलिक ग्रंथांना योग्य पारितोषकें व मान्यता देऊन प्रोत्साहित करण्याच्या हेतूने तसेच भिन्न भिन्न भारतीय भाषा व जगांतील प्रमुख भाषा यामधून हिंदी व मराठींत अनुवाद करणाऱ्या लेखकांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने 'मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्' या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे.

सदस्य

सध्या परिषदेचे सदस्य खालीलप्रमाणे आहेत:—

(१)	पंडित रविशंकर शुक्ल	मुख्य मंत्री, मध्यप्रदेश	अध्यक्ष
(२)	श्री. पुरुषोत्तम काशीराव देशमुख	शिक्षण मंत्री, मध्यप्रदेश	
(३)	श्री. राजाबहादुर वीरेन्द्र बहादुरसिंह	मुख्य मंत्र्याचे उपमंत्री	
(४)	श्री. अब्दुल कादिर सिद्दीकी	शिक्षण मंत्र्याचे उपमंत्री	
(५)	पंडित कुंजीलाल दुबे	उपकुलगुरु, नागपूर विश्वविद्यालय	
(६)	डॉ. रामप्रसाद त्रिपाठी	उपकुलगुरु, सागर विश्वविद्यालय	
(७)	श्री. ब्रिजलाल बियाणी	अध्यक्ष, हिंदी साहित्य सम्मेलन	
(८)	श्री. ह. ना. नेने	अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ	
(९)	पंडित द्वारकाप्रसाद मिश्र		
(१०)	श्री. ग. त्र्यं. माडखोलकर		
(११)	श्री. शुकदेवप्रसाद तिवारी		
(१२)	डॉ. शं. दा. पेंडसे		
(१३)	श्री. रमाप्रसन्न नायक	सचिव, शिक्षण व भाषा विभाग, मध्यप्रदेश	सचिव
(१४)	डॉ. वा. ना. पंडित	संचालक, भाषा विभाग	कोषाध्यक्ष
(१५)	श्री. गोपाल शर्मा	उपसंचालक, भाषा विभाग	सहायक सचिव

पारितोषकांची घोषणा

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेतर्फे १९५४-५५ सालीं खालील विषयांवरील हिंदी व मराठी पुस्तकांना जीं पारितोषकें दिलीं जाणार आहेत त्यांचा तपशील पुढीलप्रमाणें:—

अनुक्रमणिका

विषय	रकम

(क) प्रादेशिक पारितोषकें

१. कादंबरी	१,०००
२. नाटक (अभिनेय)	१,०००
३. वाङ्मयीन टीकात्मक ग्रंथ	१,०००
४. मध्यप्रदेशाच्या बोलभाषांमधील लोकगीतांचा संग्रह (संपादकीय टीकाटिप्पणीसहित)	१,०००
५. हिंदी अथवा मराठी प्राचीन अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथाचें सम्पादन	१,०००
६. बालवाचकांकरितां कादंबरी	७५०
७. लेखकाच्या स्वतःच्या लघुकथांचा संग्रह	५००
८. लेखकाच्या स्वतःच्या कवितांचा संग्रह	५००
९. लेखकाच्या स्वतःच्या एकांकिकांचा संग्रह	५००
१०. एखाद्या आर्थिक समस्येवरील विवेचनात्मक पुस्तक.	५००
११. सामान्यविज्ञान या विषयावरील पुस्तक	५००

(ख) अखिल भारतीय पारितोषक

१. वाङ्मयीन टीका प्रबंध	१,५००

नियमावली

१. वरील खण्ड (क) खालील पारितोषकें केवळ मध्यप्रदेशांत राहाणाऱ्या ग्रंथकारांनाच दिलीं जातील. येथे मध्यप्रदेशांत 'राहाणारा' या शब्दाचा अर्थ, इतर सरकारी कामकाजांत "बोनाफाईड रेसिडेंट" या शब्दांचा जो अर्थ होतो तोच आहे.

२. हिंदी व मराठींतील पुस्तकांना प्रत्येकीं वेगवेगळें पारितोषक दिलें जाईल.

३. पारितोषकांकरिता प्रकाशित व हस्तलिखित अशीं दोन्ही प्रकारचीं पुस्तकें स्वीकारण्यांत येतील. हस्तलिखित प्रती स्वच्छ व सुवाच्च असाव्यात. प्रत्येक पुस्तकाच्या चार प्रती पाठवाव्या लागतील.

४. पारितोषकाकरितां पाठविलेलीं पुस्तकें २६ जानेवारी १९५० नंतर लिहिलेलीं असावींत. या संबंधांत लेखकाने त्या आशयाचें एक प्रमाणपत्र स्वतःच्या सहीनिशीं सोबत जोडावें.

५. पुस्तकें आवश्यक तेवढ्या उच्च दर्जाचीं असावींत. पारितोषकासाठी घोषित केलेल्या विषयावरील पुस्तक परिषदेने अपेक्षिलेल्या दर्जाचें नसेल तर त्या विशिष्ट विषयावरील पुस्तकाकरिता ठेवलेलें पारितोषक त्या वर्षी दिलें जाणार नाही.

६. खण्ड (क) मधील क्रमांक १० व ११ वर दिलेल्या विषयावरील पुस्तकें सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने लिहिलेलीं असावींत.

७. वर्तमान आर्थिक प्रश्नांपैकी एखादा व कांही प्रश्न घेऊन त्याचें विवेचन आकर्षक व ज्ञानवर्धक रीतीने केलेलें असावें. तसेंच भारतीय जीवनाचा त्यांत विचार केलेला असावा. आवश्यक असेल तेथे चित्रें व आकृत्या दिलेल्या असाव्यात.

८. सामान्य विज्ञानाचें (जनरल सायन्स) पुस्तक लोकांची विज्ञानविषयक गोडी वाढेल या उद्देशाने लिहिलेलें असावें. विषय विवरणाची शैली आकर्षक असावी आणि शास्त्रीय बारकावे संभाळून व योग्य चित्रें आकृत्या इत्यादि देऊन विषय स्पष्ट केलेला असावा.

९. अखिल भारतीय पारितोषकाकरितां जे ग्रंथ पाठविले जातील त्यांना फक्त वरील नियम १ लागूं होणार नाही.

१०. पारितोषकाकरिता पाठवावयाचीं पुस्तकें परिषदेच्या कार्यालयांत ३१ जुलै १९५४ रोजीं सायंकाळीं ४ वाजण्यापूर्वी पोहोचलींच पाहिजेत. या संबंधीचा सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा—

सचिव, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्,
संचालनालय, भाषा विभाग, रामदासपेठ,
नागपूर.

११. पुस्तकाच्या आकारासंबंधी कोणतेंहि निश्चित बंधन घातलेलें नाही.

१२. पारितोषकाचे विषय अगोदरच जाहीर करण्यांत आले आहेत. विषयांसंबंधी विस्तृत व्याख्या देतां येणें आम्हाला शक्य होणार नाही. साहित्यांत त्या शब्दाचे जे अर्थ असतील ते ध्यानांत घेऊनच लेखकांनी योग्य तो निर्णय घेण्याची कृपा करावी.

१३. पुस्तकें पोंच-पत्रासह रजिस्टर्ड डाकेने वा पार्सल करून पाठवावींत. पुस्तक डाकमार्गांत गहाळ झाल्यास त्याबाबतची कोणतीहि जबाबदारी परिषदेवर राहणार नाही.

१४. ज्या पुस्तकांना यापूर्वी पारितोषकें मिळालेलीं असतील त्यांना पुन्हा पारितोषक दिलें जाणार नाही.

१९५५–५६ सालचीं पारितोषकें

लेखकांना पुरेसा अवधि मिळावा या हेतूने परिषदेने १९५५–५६ सालीं द्यावयाचीं पारितोषकें याचवर्षी जाहीर केलीं आहेत. ज्या विषयांकरिता पारितोषकें दिलीं जातील त्यांचा तपशील खालील-प्रमाणे आहे—

मध्यप्रदेशांतील बोलीचा / बोलींचा भाषा शास्त्राच्या दृष्टीने अभ्यास	१,००० रुपयें
समीक्षाशास्त्र—अखिल भारतीय पारितोषक	१,५०० रुपयें

हीं दोन्हीं पारितोषकें हिंदी व मराठी पुस्तकांकरिता प्रत्येकीं वेगवेगळी दिलीं जातील.

प्रादेशिक भाषांतील पुस्तकांचा अनुवाद

परिषदेने आपल्या तत्वानुसार खालील अनुवाद कार्य करण्याचें निश्चित केलें आहे.

(१) दोन पुस्तकें हिंदींतून मराठींत

(२) दोन पुस्तकें मराठींतून हिंदींत

(३) खाली दिलेल्या प्रत्येक भाषेमधून एक पुस्तक— १, कानडी २, तेलगु ३, मल्याळी ४. तामिळ ५. ओडिया

अनुवादाकरितां लेखकांची व ग्रंथांची निवड करण्याचें काम परिषदेच्या अनुवाद समितीकडे राहील.

विद्यार्थ्यांकरिता हिंदी-मराठी निबंध स्पर्धा

हिंदी व मराठी साहित्यांतील तरुण होतकरू लेखकांना उत्तेजन मिळावें ह्या हेतूनें दर वर्षी एक निबंध स्पर्धा सुरू करण्याचें परिषदेने ठरविलें आहे. या स्पर्धेत भिन्न भिन्न विषयावरील पांच हिंदी व पांच मराठी निबंधांना पारितोषकें देण्यांत येतील. त्यासंबंधींची आवश्यक माहिती नंतर प्रसिद्ध करण्यांत येईल.

साहित्यिकांची व्याख्यानमाला

सन १९५४-५५ सालीं व्याख्यानमाला गुंफण्यासाठी हिंदी / मराठींतील अखिल भारतीय कीर्तीच्या विद्वान साहित्यिकांना पाचारण करण्याचें परिषदेने ठरविलें आहे. त्यांचीं व्याख्यानें पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचाहि विचार आहे. आमंत्रित साहित्यिकांचीं नावें लवकरच जाहीर करण्यांत येतील.

ह. रमाप्रसन्न नायक
सचिव,
मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्

क्षमस्व

विदर्भ साहित्य मंदिराच्या उद्घाटनाचा वृत्तांत व त्या प्रसंगाचे कांही फोटो या अंकांत देणें उचित होतें. फोटो मिळवून त्यांचे ब्लाक करून छापण्यास लागणाऱ्या वेळामुळे या अंकाच्या प्रकाशनास विलंब झाला आहे. त्याबद्दल सभासदांची आम्ही माफी मागतों.

—संपादक



वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने राष्ट्रपतींचे स्वागत करीत आहेत.
व्यासपीठावर मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल, राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या आणि माजी गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र बसले आहेत.

महत्त्वाची सूचना

विदर्भ साहित्यसंघाने यावर्षी मध्यप्रदेशांतील, मराठीच्या एका किंवा अनेक बोलींचें शास्त्रशुद्ध संशोधन करण्याचें योजिलें आहे. अशा प्रकारचें काम अंगावर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी आपलीं नांवें संघाध्यक्षांकडे देऊन चौकशी करावी. हें काम करूं इच्छिणारे संशोधक, मराठी विषय घेऊन एम्. ए. परीक्षेंत पहिल्या किंवा निदान दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेले व भाषाशास्त्राची विशेष आवड असलेले असावे. हें काम करण्यासाठी त्यांनी संपूर्ण वेळ देण्याचें व संशोधनाप्रीत्यर्थ अवश्य असल्यास प्रवास करण्याचें लेखी आश्वासन दिलें पाहिजे. या कामासाठी ज्या संशोधकाची निवड केली जाईल, त्या संशोधकास विदर्भ साहित्य संघाकडून शिष्यवृत्ति देण्यांत येईल. संशोधनात्मक प्रबंध एक वर्षात पुरा झाला पाहिजे. कामाला प्रारंभ १ जुलै १९५४ पासून केला पाहिजे.

ह. ना. नेने.
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी याना नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर येथें मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथें प्रकाशित केलें.